सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

QR कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com RNI No. - MAHMAR 2023/84526 Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - ३ रे ❑ अंक - २३३ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि. १६ आक्टोंबर २०२५ ❑ संपादक - डॉ. शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६

## सरन्यायाधीश भूषण गवईंवर बूट फेकणाऱ्या राकेश किशोर यांच्यावर अवमानाचा खटला, दिवाळीनंतर सुनावणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ नवी दिल्ली**

सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या दिशेने बूट फेकण्याची घटना मागच्या आठवड्यात ६ ऑक्टोबरला घडली होती. या प्रकरणी वकील राकेश किशोर यांच्याविरोधात अवमानाचा खटला चालणार आहे. महाधिवक्ता. आर. वेंकरमनी यांच्याकडे याबाबतची संमती मागितली होती. ती त्यांनी दिली आहे. त्यामुळे आता वकील राकेश किशोर यांच्यावर अवमानाचा खटला चालणार आहे. दिवाळीच्या सुट्टीनंतर या प्रकरणी सुनावणी सुरु करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

१६ ऑक्टोबरला हे प्रकरण जज सूर्यकांत यांच्या अध्यक्षते खाली असलेल्या पीठासमोर ठेवण्यात आलं. या पीठात जस्टिस जोयमाल्या बागचीही आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या असोसिएशनचे अध्यक्ष वरिष्ठ वकील विकास सिंह आणि सॉलिसिटर जनरल तुषार मेहता हे या पीठासमोर हजर झाले. त्यांनी कारवाईची संमती मिळाल्याची माहिती या बेंचला दिली.



सर्वोच्च न्यायालयात सुनावणीवेळी ७१ वर्षीय वकिलाने सरन्यायाधीश भूषण गवई यांच्या दिशेने बूट फेकण्याचा प्रयत्न केल्याचा प्रकार ६ ऑक्टोबरला घडला. राकेश किशोर असे या वकिलाचे नाव असून, या घटनेनंतर देशभरातून याचा निषेध करण्यात आला.

पोलीस अधिकाऱ्यांच्या हवाल्याने मिळालेल्या माहितीनुसार, राकेश किशोर हे सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशनचे नोंदणीकृत सदस्य आहेत आणि ते दिल्लीच्या मयूर विहार परिसरात राहतात. त्यांनी २००९ मध्ये दिल्ली बार कौन्सिलमध्ये नोंदणी केली होती. ज्येष्ठ वकील असलेले राकेश किशोर हे अनेक वर्षांपासून विविध बार असोसिएशन्सचे सदस्य राहिले आहेत. पोलिसांना राकेश किशोर यांच्याकडे सर्वोच्च न्यायालय बार असोसिएशन, शाहदरा बार असोसिएशन आणि दिल्ली बार कौन्सिलचे सदस्यत्व कार्ड असल्याचे आढळले होते. आता राकेश किशोर यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. उल्लेखनीय आहे की सरन्यायाधीश गवई यांनी याप्रकरणी स्वतः कोणताही गुन्हा दाखल करण्यास नकार दिला होता.

## बिहारमध्ये राजकीय पक्षांत रंगणार 'एअर वॉर' कोणाचे नेते सर्वाधिक हेलिकॉप्टरने येणार

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६नवी दिल्ली**

बिहारमधील राजकीय पक्षांनी विधानसभेची लढाई जिंकण्यासाठी 'एअर स्ट्राइक'चा मार्ग निवडला आहे आणि पाटणा विमानतळाचा उपयोग 'कमांड सेंटर' म्हणून होणार आहे. थोडक्यात, निवडणुकीच्या प्रचारात हेलिकॉप्टरचा आवाज अख्ख्या बिहारमध्ये ऐकायला मिळणार आहे.



निवडणुकीची लढाई जमिनीवर लढली जाणार असली तरी राजकीय पक्ष विरोधकांवर आकाशातून मारा करण्याची योजना आखत आहेत. यात भारतीय जनता पक्ष पहिल्या, तर काँग्रेस दुसऱ्या क्रमांकावर आहे. निवडणुकीच्या प्रचारासाठी भाजपने पाच ते सहा हेलिकॉप्टर बुक केली आहेत. काँग्रेसने तीन हेलिकॉप्टरची व्यवस्था केली आहे. मुख्यमंत्री नितीशकुमार यांच्या जेडीयूकडे दोन, माजी केंद्रीय मंत्री लालूप्रसाद यादव यांच्या 'राजद'कडे दोन आणि 'एआयएमआयएम'चे प्रमुख असदुद्दीन ओवैसी एका हेलिकॉप्टरच्या माध्यमातून विरोधकांवर एअर स्ट्राइक करताना दिसतील.

**३० हेलिकॉप्टर पार्क करण्याची क्षमता**

पाटणा विमानतळाची ३० हेलिकॉप्टर पार्क करण्याची क्षमता आहे. ही बाब लक्षात घेता व्यवस्थापन पूर्णपणे सतर्क आहे. दररोज १२ ते १५ हेलिकॉप्टर येथून उड्डाण करणार आहेत. भाजप पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांच्यासह स्टार प्रचारकांसाठी हेलिकॉप्टरचा उपयोग करणार आहे. याशिवाय, नितीशकुमार, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, माजी उपमुख्यमंत्री तेजस्वी यादव यांच्यासह विविध पक्षांच्या नेत्यांकडून हेलिकॉप्टरचा वापर होणार आहे. हेलिकॉप्टरने येता-जाता वस्तूंची तपासणी होईल. आयकर खात्याची टीमही तैनात करण्यात आली आहे. एका हेलिकॉप्टरचे भाडे ताशी २.१० लाख रुपये आहे. किमान ३ तासांसाठी हेलिकॉप्टर बुक करावे लागेल.

## सरकारचा जीआर निघाल्यानंतर कुणबीचे फक्त २७ दाखले जारी

### बबनराव तायवाडेंनी दिली आकडेवारी मनोज जरांगेंना धक्का असल्याचा दावा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ मुंबई**

२ सप्टेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयाविरोधात राज्यातील वातावरण तापलेले असतानाच राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे यांनी एक धक्कादायक आकडेवारी समोर आणली आहे. तायवाडे यांच्या मते, मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत २ सप्टेंबर ते ७ ऑक्टोबर या कालावधीत फक्त ७३ अर्ज प्राप्त झाले, आणि त्यापैकी फक्त २७ अर्ज मंजूर झाले आहेत. बबनराव तायवाडेंनी सादर केलेल्या आकडेवारीमुळे मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील आणि ओबीसी नेत्यांना जोरदार धक्का बसणार आहे.



ऑगस्टच्या अखेरीस २९ तारखेला मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईच्या आझाद मैदानात उपोषणाची घोषणा केली होती. या उपोषणात लाखो मराठा कार्यकर्ते सहभागी झाले. या उपोषणामुळे मुंबईतील वाहतूक जाम झाली होती आणि काही लोकांनी ही बाब हायकोर्टात नेली. हायकोर्टानंतर लगेचच राज्य सरकार आणि आंदोलनकर्त्यांमध्ये चर्चेच्या फेऱ्या झाल्या. अखेर २ सप्टेंबर २०२५ शासनाने हैदराबाद गॅझेट लागू करण्याचा जीआर मंजूर केल्यानंतर मनोज जरांगेंचे उपोषण सुटले. आता बबनराव तायवाडे यांनी केलेल्या दाव्यामुळे खळबळ उडाली आहे.

**नेमके काय म्हणाले बबनराव तायवाडे?**

राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी एका वृत्तवाहिनी संवाद साधताना मराठवाड्यात कुणबी जात प्रमाणपत्रासाठी किती अर्ज आले आणि किती प्रमाणपत्रे वितरीत झाली याची आकडेवारी दिली. ते म्हणाले, मराठवाड्यातील आठ जिल्ह्यांत २ सप्टेंबर ते ७ ाक्टोबर या कालावधीत फक्त ७३ अर्ज प्राप्त झाले आणि त्यापैकी २७ अर्जच मंजूर झाल्याचा दावा डॉ. बबनराव तायवाडे यांनी केला. २ तारखेच्या जीआनंतर ३५ दिवसांत मराठवाड्यात फक्त २७ अर्ज मान्य झाले. मराठा समाजाला सरसकट ओबीसी प्रमाणपत्र देण्यात आले नसल्याचा सरकारी पुरावाच तायवाडे यांनी सादर केला.

बबनराव तायवाडे पुढे म्हणाले, जर सरसकट ओबीसी प्रमाणपत्र मिळाले असते तर रांगा लागल्या असत्या. ओबीसी नेत्यांनी अभ्यास करुन वक्तव्य करावे. बेजबाबदारपणे वक्तव्य करु नये. ओबीसी तरुणांनी केलेल्या आत्महत्यांसाठी आरक्षण संपले म्हणणारे जबाबदार असल्याचा आरोप तायवाडे यांनी केला.

**२ सप्टेंबरच्या जीआरमुळे ओबीसी समाज आक्रमक**

हैदराबाद गॅझेटच्या माध्यमातून कुणबी जात प्रमाणपत्राचे वाटप सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे, तर सातारा गॅझेटवरही लवकरच निर्णय अपेक्षित आहे. या जीआरवर मंत्री छगन भुजबळ, विजय वडेट्टीवार आणि इतर नेत्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली होती. ओबीसी समाजाकडून राज्यात ठिकठिकाणी आंदोलने आणि मोर्चे काढण्यात तयारी केली आहे.

## मनसेला सोबत घेण्यास काँग्रेस प्रदेशाध्यक्षांचा विरोध

### संजय राऊत यांनी हायकमांडकडे तक्रार केल्याची माहिती; काँग्रेसच्या वर्तुळात नाराजी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ मुंबई**

राज ठाकरे यांच्या नेतृत्वातील महाराष्ट्र नवनिर्माण सेनेला महाविकास आघाडीत घेण्यावरून काँग्रेस व शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षात खटके उडत असल्याचे चित्र आहे. काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी मनसेला सोबत घेण्याच्या मुद्यावर कथितपणे नकारात्मक भूमिका घेतली आहे. त्यामुळे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी या प्रकरणी थेट काँग्रेस हायकमांडकडे तक्रार केल्याची माहिती आहे. या घटनाक्रमामुळे काँग्रेस पक्षश्रेष्ठी चांगलेच नाराज झालेत. त्यामुळे या प्रकरणाचे राजकारण पुढील काही दिवसांत चांगलेच तापण्याची चिन्हे आहेत.

राज्यात सध्या ठाकरे बंधूंच्या राजकीय मनोमिलनाची चर्चा कळसाला पोहोचली आहे. हे दोन्ही बंधू मराठीच्या मुद्यावर एकत्र आलेत. त्यानंतर आता ते मुंबई महापालिकेसह स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांनाही संयुक्तपणे सामोरे जाण्याची शक्यता आहे. पण आता ठाकरे गटाकडून राज ठाकरे यांना महाविकास आघाडीत आणण्याचा प्रयत्न



केला जात आहे. पण त्याला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी विरोध केल्याचा दावा केला जात आहे. त्यावर संजय राऊत यांनी एका पत्राद्वारे थेट दिल्ली स्थित काँग्रेस पक्षश्रेष्ठींकडे तक्रार केल्याची माहिती आहे.

**काय म्हणाले हर्षवर्धन सपकाळ?**

उल्लेखनीय बाब म्हणजे मनसे व महाविकास आघाडीच्या नेत्यांनी मंगळवार व बुधवार असे सलग २ दिवस राज्य निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या. विरोधकांच्या या शिष्टमंडळात सुरुवातीला हर्षवर्धन सपकाळ यांचे नाव होते. पण ऐनवेळी त्यांना दिल्लीला जावे लागल्यामुळे त्यांना या शिष्टमंडळासोबत जाता आले नाही. पण आता त्यांच्या दिल्ली दौऱ्यामागे संजय राऊत यांचे पत्र असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली आहे. पण सपकाळ यांनी ही चर्चा फेटाळून लावली आहे. ते या घटनाक्रमाविषयी बोलताना म्हणाले, निवडणूक आयोगाला भेटण्यासाठी गेलेले शिष्टमंडळ हे मनसेला सोबत घेण्यासंदर्भात नव्हते. हे शिष्टमंडळ निवडणुकीतील घोटाळ्याविषयी निवडणूक आयोगाला भेटले. त्यात आघाडी किंवा युतीच्या चर्चा होण्याचा प्रश्नच नाही.

काँग्रेसचे प्रतिनिधी म्हणून आमचे लोक त्यात सहभागी झाले होते. मी सुद्धा या शिष्टमंडळासोबत जाणार होतो. पण मला ऐनवेळी दिल्लीतून बोलावणे आल्यामुळे मला तिकडे जावे लागले. मी पक्षाच्या कामासाठी दिल्लीला गेलो. आमचे नेते राहुल गांधी यांनी यापूर्वीच निवडणूक आयोगाच्या मुद्यावर आपली विस्तृत भूमिका जाहीर केली आहे. आत्ता कुणाला आघाडीत घ्यायचे किंवा कुणाला घ्यायचे नाही याचा निर्णय दिल्लीत होईल. संजय राऊत आमच्या इंडिया आघाडीचे नेते आहेत. त्यांच्यासोबत संवाद साधण्यास मला कोणतीही समस्या नाही. मी त्यांना दिवाळीच्या शुभेच्छा देईन, असे ते म्हणाले.

**काँग्रेसचे राज्यातील नेते संजय राऊतांवर नाराज?**

दुसरीकडे, राज ठाकरे यांनी मराठीच्या मुद्यावर आतापर्यंत अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. मूळात त्यांचे राजकारणच त्यावर अवलंबून आहे. त्यामुळे त्यांना महाविकास आघाडीत घेतले तर आपले हिंदी भाषिक मतदार दूर जातील अशी भीती काँग्रेसला वाटत आहे. त्यातच संजय राऊत यांनी या प्रकरणी थेट हायकमांडकडे तक्रार केल्यामुळे काँग्रेसचे राज्यातील नेते नाराज झाल्याची माहिती आहे.

## उद्धव ठाकरे करणार मनसेच्या दीपोत्सवाचे उद्घाटन

### गेल्यावर्षीच निवडणूक आयोगाकडे केली होती तक्रार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६ मुंबई**

दादरच्या शिवाजी पार्क मैदान परिसरात मनसेतर्फे दरवर्षीप्रमाणे यंदाही दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, गेल्या वर्षी ज्या राजकीय पक्षाने या दीपोत्सवाची तक्रार निवडणूक आयोगाकडे केली होती, त्या उद्धवसेनेचे प्रमुख उद्धव ठाकरेच यंदाच्या दीपोत्सवाचे उद्घाटन करणार आहेत.

मनसेच्या दीपोत्सवाचे हे १३ वे वर्ष असून, तो १७ ते २६ ऑक्टोबरदरम्यान साजरा होणार आहे. यानिमित्त शिवाजी पार्क परिसरात आकर्षक रोषणाई आणि कंदिलांनी सजावट केली जाणार आहे. या दीपोत्सवाचे मुंबईकरांमध्ये, विशेषतः तरुण पिढीत आकर्षण आहे.

**नेमके काय झाले होते गेल्या वर्षी?**

गेल्या वर्षीचा दीपोत्सव विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर साजरा करण्यात येत होता. मनसेने या दीपोत्सवात




काही ठिकाणी कंदिलांवर पक्षाचे नाव आणि निवडणूक चिन्ह छापले, असा आक्षेप घेत उद्धवसेनेचे खा. अनिल देसाई यांनी मुख्य निवडणूक अधिकारी एस. चोक्कलिंगम यांच्याकडे आचारसंहितेचा भंग केल्याची तक्रार केली होती. या दीपोत्सवात मनसेचे माहीम विधानसभेचे तत्कालीन उमेदवार अमित राज ठाकरे उपस्थित राहिल्याने या कार्यक्रमाचा संपूर्ण खर्च त्यांच्या निवडणूक खर्चात समाविष्ट करावा, अशी मागणी देसाई यांनी केली होती.

हिंदी सक्तीविरोधातील एकत्रित भूमिकेनंतर मुंबई महापालिकेच्या निवडणुकीसाठी ठाकरे बंधूंची युती होण्याच्या चर्चेलाही अधिक जोर मिळाला आहे. अलीकडेच गणेशोत्सव, वाढदिवस आणि कौटुंबिक भेटीतून जवळीकही दिसून आली असून, मतदार यादीतील घोळ या विषयावरही ठाकरे बंधूंनी पुढाकार घेतला आहे.

## मोदी-शहांच्या गुजरातमध्ये मोठी घडामोड

### मुख्यमंत्री सोडून सर्व मंत्र्यांचा तडकाफडकी राजीनामा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. १६ गांधीनगर**

गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्या नेतृत्वात झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वाची घडामोड घडली आहे. मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्या मंत्रिमंडळातील सगळ्या सदस्यांनी राजीनामा दिला आहे. केंद्रीय नेतृत्त्वाच्या आदेशानंतर सगळ्या मंत्र्यांनी राजीनामा दिला आहे. मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी झालेल्या बैठकीत वरिष्ठ नेत्यांनी हा निर्णय मंत्र्यांना कळवला. यानंतर मंत्र्यांनी त्यांचे राजीनामे मुख्यमंत्री पटेल यांच्याकडे सोपवले. पटेल यांच्या मंत्रिमंडळातील १२ मंत्री राजीनामे देतील, अशी शक्यता होती. पण मुख्यमंत्री वगळता सर्वच्या सर्व मंत्र्यांचा राजीनामा घेण्यात आलेला आहे.

मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल आज रात्री राज्यपालांची भेट घेऊन सगळ्या मंत्र्यांचे राजीनामे त्यांच्याकडे सुपूर्द करतील. कॅबिनेट विस्ताराच्या दृष्टीनं मंत्र्यांचे राजीनामे घेण्यात आलेले आहेत. याबद्दल भाजप किंवा मुख्यमंत्री कार्यालयाकडून अद्याप तरी कोणतीही अधिकृत माहिती देण्यात आलेली नाही. शुक्रवारी म्हणजेच उद्या सकाळी साडे अकरा वाजता गांधीनगर येथील महात्मा मंदिरात नव्या मंत्रिमंडळाचा शपथविधी संपन्न होईल.

## संपादकीय ......

# नक्षलवादाच्या मुळावर घाव घातल्याचा परिणाम चांगला

सशस्त्र नक्षलवाद्यांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी केंद्र सरकारने राबवलेल्या मोहिमेला दिवसेंदिवस मोठे यश मिळत आहे. देशातील नक्षलवाद्यांना शस्त्र खाली ठेवायला सांगून यांचे पुनर्वसन करण्याची योजना केंद्र सरकारने यापूर्वीच जाहीर केली होती. याला प्रतिसाद न देणार्‍यांशी दोन हात करून त्यांचा खात्मा करण्यातही सरकार पुढे होते. अखेर या प्रयत्नांना यश आल्याचे बुधवारी अधोरेखित झाले. पाच राज्यांमधील नक्षलवादी हल्ल्यांचा सूत्रधार आणि मोस्ट वॉन्टेड नक्षलवादी टॉप कमांडर मल्लोजुला वेणुगोपाल राव ऊर्फ भूपती याने त्याच्या ६० हून अधिक नक्षली साथीदारांसह मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत बुधवारी आत्मसमर्पण केले. भूपती हा माओवादी संघटनेच्या केंद्रीय समितीचा सदस्य आणि पॉलिट ब्युरोचा तगडा सदस्य होता. भूपती हा सोनू, सोनू दादा, वेणुगोपाल, अभय, मास्टर, विवेक आणि वेणू यासारख्या अनेक नावांनी ओळखला जातो. भूपतीच्या आत्मसमर्पणामुळे नक्षलवादी चळवळीचा अंत जवळ आल्याचे म्हटले जात आहे, याचे श्रेय निश्चितच केंद्र सरकारला आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या नेतृत्वाला द्यावे लागेल.

वास्तविक सुरक्षा दलांनी कोंडी केल्यामुळे नक्षलवादी आणि त्यांचे नेते अडचणीत सापडले आहेत. विशेष म्हणजे यंदा चार महिन्यांत दोनदा नक्षलवाद्यांनी सरकारसमोर शस्त्रसंधी तसेच शांतीचा प्रस्ताव ठेवला होता. यात भूपती आघाडीवर होता. तेव्हाच नक्षलवाद्यांमध्ये उभी फूट पडल्याचे निश्चित झाले होते. यंदा मे महिन्यात नक्षलवाद्यांनी पहिल्यांदा नक्षलवाद्यांविरोधात कारवाई थांबवण्याची सरकारकडे विनंती केली होती. मात्र, सरकारने त्यांच्या आवाहनाला अजिबात जुमानले नाही. उलट छत्तीसगड तसेच दंडकारण्यातील सुरक्षा यंत्रणांच्या कारवाया अधिक जोमाने सुरू ठेवल्या. त्यानंतर २१ मे रोजी नक्षल्यांचा सर्वोच्च नेता खंबाला केशवराव ऊर्फ बसवराजू याला चकमकीत ठार करण्यात आले. यामुळे नक्षलवाद्यांना मोठा धक्का बसला होता. त्यानंतर भूपतीने पुन्हा पत्रक काढून सरकारकडे शस्त्रसंधीची विनंती केली होती. १७ सप्टेंबर रोजी त्याने अल्पकाळासाठी शस्त्रसंधीची तयारी दाखवली होती. भूपतीची ही भूमिका केंद्रीय समितीतील सदस्यांना अजिबात पटली नाही. भूपती हा नक्षलवादी संघटनेचा प्रभावशाली रणनीतिकार मानला जातो. तो अनेक वर्षे महाराष्ट्र-छत्तीसगड सीमेवरील प्लाटूनचा मार्गदर्शक होता. असे असूनही त्याने सशस्त्र संघर्ष निष्फळ ठरल्याचे मान्य करून शस्त्रसंधी स्वीकारण्याचे आवाहन केले होते.

संघर्ष नव्हे तर संवादच पर्याय आहे, अशी भूमिका तो वारंवार घेत होता. मात्र, भूपती या निर्णयाप्रती एका रात्रीत आला नव्हता. कारण दोन दशकांत गडचिरोली जिल्ह्यात ७०० हून अधिक नक्षलवाद्यांनी आत्मसर्मपण करून शांततेत जगण्याचा मार्ग स्वीकारला होता. सरकारनेही त्यांच्या पुनर्वसनाची जबाबदारी स्वीकारली होती. आणखी एक महत्त्वाची घटना या वर्षाच्या सुरुवातीलाच घडली. भूपतीची पत्नी नक्षलवाद्यांच्या दंडकारण्य विभागाची सदस्य विमला ऊर्फ तारक्का हिने मुख्यमंत्री फडणवीस यांच्या उपस्थितीत आत्मसर्मपण केले होते. तर केंद्रीय समिती सदस्य आणि सर्वोच्च महिला नक्षल नेत्या पोथुला पद्मावती ऊर्फ सुजाता हिने सप्टेंबरमध्ये शरणागती स्वीकारली होती. सुजाता ही भूपतीची वहिनी आहे. तर भूपतीचा मोठा भाऊ किशनजी २०११ मध्ये पश्चिम बंगालमधील चकमकीत ठार झाला होता. त्यामुळे संघर्षापेक्षा संवादच महत्त्वाचा याची प्रचिती भूपतीला येत होती. शिवाय त्याच्या घरातील सदस्यच आत्मसमर्पण करत होते. त्यामुळे लढून उपयोग होत नाही, याची जाणीव त्याला झाली होती. म्हणून भूपती वारंवार शस्त्रसंधीचा प्रस्ताव सरकारपुढे ठेवत होता.

भूपती वाणिज्य शाखेतील पदवीधर आहे. २०१० मध्ये माओवादी प्रवक्ते चेरुकेरी राजकुमार (आझाद) यांच्या हत्येनंतर भूपती माओवाद्यांचा आवाज बनला होता. त्याने जवळजवळ चार दशके रेड कॉरिडॉरमध्ये दहशत पसरवली होती. विशेष म्हणजे अनेक मोठ्या हल्ल्यांचे नियोजन आणि अंमलबजावणी करण्यात भूपतीचा सहभाग होता. त्यामुळे महाराष्ट्रासह ओडिशा, तेलंगणा, छत्तीसगड आणि आंध्र प्रदेशासह अनेक राज्यांतील पोलीस त्याच्या मागावर होते. भूपतीला पकडून देण्यासाठी सरकारने १ कोटी रुपयांचे बक्षीस जाहीर केले होते. यावरून भूपतीची दहशत आणि त्याचे नक्षलींमधील स्थान लक्षात येते. नक्षलवाद्यांचा बिमोड करण्यासाठी मोदी सरकारने दशकापूर्वी योजना आखली होती. त्यांच्या विरोधात सशस्त्र कारवाई अधिक कडक केली होती.

नक्षलवाद्यांनी एकतर शस्त्र ठेवून आत्मसमर्पण करून मुख्य प्रवाहात सहभागी व्हावे अन्यथा त्यांचा सशस्त्र कारवाईत खात्मा करायचा, हे दोनच पर्याय केंद्र सरकारने त्यांच्यासमोर ठेवले होते. त्यानंतरही नक्षलींकडून वारंवार कमांडोंवर हल्ले सुरूच होते. मात्र, न डगमडता सरकार त्यांचे हल्ले परतवून कारवाई करत होते. या मोहिमेचा परिणाम असा झाला की हळूहळू नक्षलवाद्यांनी आत्मसमर्पणाचा मार्ग स्वीकारायला सुरुवात केली. आताही भूपतीनंतर आणखी काही नक्षलवादी आत्मसमर्पण करणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्ट केले. नक्षलवाद्यांची सशस्त्र मोहीम हाणून पाडण्यात सशस्त्र दलाला यश येत आहे, हे यश केंद्र सरकारने राबवलेल्या मोहिमेचे आहे. याबद्दल केंद्र आणि राज्य सरकारचेही अभिनंदन करायला हवे!

# ड्रोन खरेदीसाठी ५ लाख रुपयांपर्यंत अनुदान, अर्ज प्रक्रिया, अनुदानाचे स्वरूप, वाचा सविस्तर




**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक-** जिल्हा परिषदेने महिला सक्षमीकरण आणि आधुनिक शेतीला चालना देण्यासाठी महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. महिला बचत गट, शेतकरी गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांना ड्रोन खरेदीसाठी आर्थिक अनुदान देण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या 'नमो ड्रोन दीदी' योजनेच्या तसेच राज्य कृषी विभागाच्या कृषी यांत्रिकीकरण उप-अभियानांतर्गत जिल्ह्यातील महिला बचत गटांना ड्रोन तंत्रज्ञानाने सुसज्ज करून अतिरिक्त उत्पन्न मिळवणे आणि त्यांची आर्थिक स्थिती सुधारणे असा उद्देश आहे. ड्रोन खरेदीसाठी किमतीच्या ६५ टक्के पर्यंत ि

कवा जास्तीत जास्त ५ लाख रुपये अनुदान मिळू शकते. इच्छुक महिला बचत गट, शेतकरी गट आणि शेतकरी उत्पादक कंपन्यांनी अधिकृत सूचना, मार्गदर्शक तत्त्वे व अर्जाची अंतिम मुदत जाणून घेण्यासाठी जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाशी संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कृषी विकास अधिकारी किरण खोमणे यांनी केले आहे.

**विविध लाभार्थ्यांसाठी अनुदानाचे स्वरूप :**

**शेतकरी, ऋझज आणि सहकारी संस्था :**

अनुदान: ६५ टक्के (जास्तीत जास्त ५ लाख रुपये प्रति ड्रोन).

महिला बचत गट :

योजना : नमो ड्रोन दीदी योजना.

अनुदान: ६५ टक्के (जास्तीत जास्त ५ लाख रुपये प्रति ड्रोन)

उद्दिष्ट : महिला बचत गटांना ड्रोन भाड्याने देण्यास सक्षम करणे

कृषी पदवीधर (कस्टम हायरिंग सेंटरसाठी):

अनुदान : ५० टक्के (जास्तीत जास्त ५ लाख रुपये प्रति ड्रोन).

शेतकरी ते थेट ग्राहक
कामधेनु नॅचरल्स
उत्तम आहार सर्वोत्तम जीवन
विषमुक्त फळे, भाजी व धान्य एकाच ठिकाणी
समर्थ हायस्कूल जवळ, अकोला अर्बन बँकेच्या बाजुने देवरणकर नगर, अमरावती
नंदकिशोर गांधी, मो. ७७२००७७५५०

### अर्ज कसा करावा :

या योजनांसाठी अर्ज करण्यासाठी, तुम्हाला चरहरवलीं या कृषी विभागाच्या पोर्टलवर जावे लागेल.

तुम्हाला ड्रोन खरेदीसाठी कृषी यांत्रिकीकरण उपअभियानांतर्गत (डच-च्) अर्ज करावा लागेल.

अधिक माहितीसाठी जवळच्या कृषी विभागाशी संपर्क साधावा.




## जेवल्यानंतर लगेच पाणी प्यायलं तर काय होतं? जेवणादरम्यान पाणी नेमकं कधी प्यावं?

**दि.१६विदर्भ प्रजासत्ताक**

निरोगी जीवनासाठी पाणी पिणे अत्यंत आवश्यक आहे, पण ते कधी आणि कसे प्यावे याचे काही नियम आहेत, विशेषत: जेवणानंतर. आयुर्वेद आणि आधुनिक पोषणशास्त्रानुसार, जेवणानंतर लगेच पाणी पिणे पचनसंस्थेसाठी योग्य मानले जात नाही, ज्यामुळे आरोग्यावर नकारात्मक परिणाम होऊ शकतो.




**जेवणानंतर किती वेळ पाणी पिऊ नये ?** जेवणानंतर लगेच पाणी पिणे टाळण्याचा सल्ला दिला जातो. सर्वसाधारणपणे, जेवणानंतर कमीतकमी ३० मिनिटे ते १ तासापर्यंत पाणी पिणे टाळावे. या वेळेत शरीराला अन्न पचवण्यासाठी आवश्यक 'पाचक अग्नी' आणि एन्झाईम्स कार्यरत राहतात.

**पाणी लगेच पिण्याचे दुष्परिणाम**

जेवणानंतर लगेच पाणी प्यायल्यास खालील समस्या उद्भवू शकतात. पोटात अन्न पचवण्याचे काम पाचक रस आणि एन्झाईम्स करतात. जेवणानंतर लगेच पाणी प्यायल्यास, पाचक रस पातळ होतात. ज्यामुळे पचनक्रिया मंदावते. अन्नाचे विघटन करण्यासाठी पोटातील नैसर्गिक आम्ल आवश्यक असते. पाणी प्यायल्याने या आम्लाची तीव्रता कमी होते, परिणामी अन्न पूर्णपणे पचत नाही. अन्न व्यवस्थित न पचल्यामुळे, ते आतड्यांमध्ये सडण्यास सुरुवात होते, ज्यामुळे पोट फुगणे, गॅस होणे आणि अपचन यांसारख्या समस्या वाढू शकतात.

पचनक्रिया मंदावल्यामुळे, शरीराला अन्नातून मिळणारे महत्त्वाचे पोषक घटक (र्छीीळशपीं) शोषून घेण्यास अडथळा येतो. काही अभ्यासानुसार, अन्न व्यवस्थित न पचल्यास इन्सुलिनची पातळी वाढू शकते, ज्यामुळे वजन वाढण्याची आणि मधुमेह होण्याची शक्यता वाढते. पचनाची गती मंदावल्यास, अन्न पोटाच्या वरच्या भागात जास्त काळ राहते. यामुळे काही वेळा पोटात तयार झालेले सिड अन्ननलिकेत परत येऊ शकते. ज्याला सिड रिफ्लक्स किंवा छातीत जळजळ म्हणतात. आपले शरीर अन्नातून जीवनसत्त्वे, खनिजे आणि प्रथिने शोषून घेते. अपूर्ण पचनामुळे, ही महत्त्वाची पोषक तत्त्वे पूर्णपणे शोषली जात नाहीत आणि शरीराबाहेर टाकली जातात. त्यामुळे तुम्ही कितीही पौष्टिक आहार घेतला तरी त्याचा पूर्ण फायदा शरीराला मिळत नाही.

# सखोल गृहपाठ आणि परिश्रम यातुन उत्तम छायाचित्रण करता येते-ज्येष्ठ छायाचित्रकार संगीता महाजन

## माहिती व जनसंपर्क विभागाची विभागस्तरीय छायाचित्रण कार्यशाळा




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६नागपूर, -**शासकीय योजना, उपक्रम जनतेपर्यंत पोचवणारा छायाचित्रकार हा शासन आणि नागरिक यांच्यातील दुवा असतो. त्यामुळे सखोल गृहपाठ आणि परिश्रम यातून छायाचित्रण करणे गरजेचे आहे.आपल्या व्यवसायाची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी सतत मेहनत करावी, अशा शब्दात ज्येष्ठ छायाचित्रकार संगीता महाजन यांनी मार्गदर्शन केले.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या नागपूर संचालक कार्यालयातर्फे विभागाच्या नागपूर व अमरावती विभागातील शासकीय छायाचित्रकारांसाठी विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात एक दिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली. या प्रसंगी मार्गदर्शन करताना त्या बोलत होत्या. नागपूर - अमरावती विभागाचे संचालक (माहिती) डॉ. गणेश मुळे अध्यक्षस्थानी होते. छायाचित्रकार हा विचार शक्तीनुसार कॅमेराची कळ दाबून उत्तमोत्तम छायाचित्र चित्रित करीत असतो. सृजनशील व संवेदनशील छायाचित्रकारीतेसाठी दृष्टिकोन असावा लागतो व तो वाचन, निरीक्षण व सतत अभ्यासाने तयार होतो. दृष्टीकोन हा छायाचित्रकारांसाठी महत्वाचा असतो, असे सांगत शासकीय विभागातील छायाचित्रकारांनी करायची तयारी व घ्यावयाची काळजी घ्यावी. शासकीय छायाचित्रकारांची विश्वसनीयता आणि जबाबदारीचे महत्व समजावून सांगताना वेळेत उपस्थित राहणे, आवश्यक साधन सामुग्री बाळगणे, शिस्त व नम्रता, निवडक छायाचित्रांची निवड व साठवण याबाबत माहिती दिली. छायाचित्रातील अचूक कॉम्पोजिंग व सिमीट्री यासोबतच कॅमेरा अँगलस, प्रकाशाच्या विविध छटा, रूल ऑफ थर्ड, डेप्थ ऑफ फिल्ड, आयएसओ, अपार्चर, लेन्स आदी तांत्रिक बाबींवर विविध छायाचित्रे व सादरीकणाद्वारे श्रीमती महाजन यांनी मार्गदर्शन केले.तत्पूर्वी, संचालक डॉ. गणेश मुळे यांनी कार्यशाळेमागील भूमिका सांगताना छायाचित्रकार हा समाजाचा महत्वाचा घटक असल्याचे सांगून शासनात छायाचित्रीकारीतेच्या विविध अंगांचे महत्व उदाहरणासहीत विशद केले. सहायक संचालक पल्लवी धारव यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले. या कार्यशाळेत नागपूर, चंद्रपूर, वर्धा, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, अमरावती, यवतमाळ या जिल्ह्यातील शासकीय छायाचित्रकार उपस्थित होते.

# प्रभात शाळेच्या विद्यार्थ्यांचीपूरग्रस्तांना एक लाख ५१ हजार रू. मदत

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अकोला,**

येथील प्रभात किडस् स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पुढाकार घेऊन पूरग्रस्त बांधवांसाठी १ लाख ५१ हजार रू. निधी गोळा केला. मुख्यमंत्री सहायता निधीसाठी ही रक्कम विद्यार्थ्यांनी आज जिल्हाधिकारी वर्षा मीना यांच्याकडे सुपुर्द केली.जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी विद्यार्थ्यांच्या या योगदानाबद्दल त्यांचे कौतुक करून आभार मानले.




महाराष्ट्रात अलिकडे झालेल्या अतिवृष्टीमुळे गंभीर पुररिस्थती निर्माण झाली आहे. या आपत्तीमध्ये अनेक संसार उधवस्त झाले असून, घरे, शेती, जनावरे व उपजिविकेची साधने वाहून गेली आहेत. तसेच हजारो कुटूंब बेघर होवून निवाऱ्याशिवाय राहत आहेत. ही स्थिती लक्षात घेऊन पूरग्रस्तांसाठी मुख्यमंत्री सहायता निधीला मदत करण्याचा निर्णय या विद्यार्थ्यांनी घेतला व प्रकल्पप्रमुख म्हणून कु अपूर्वाने संपूर्ण विद्यार्थी प्रतिनिधींसोबत जाऊन आज ह्या निधीचा धनादेश जिल्हाधिकारी महोदय यांना दिला. सर्व अधिकारी व कर्मचा-यांनी विद्यार्थ्यांच्या या सजग सामाजिक जाणीव व कृतीशीलतेमुळे सर्वांचे कौतुक केले.

# पी. आर. पोटे पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे वाचन व प्रेरणा दीन साजरा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६अमरावती-** पी. आर. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर येथे वाचन व प्रेरणा दिन साजरा करण्यात आला भारतरत्न डॉ. एपीजे अब्दुल कलाम यांच्या जयंतीनिमित्त विद्यार्थ्यांमध्ये पुस्तकां विषयी व वाचना विषयी आवड निर्माण व्हावी म्हणून हा संपूर्ण भारतभर राष्ट्रीय वाचन प्रेरणा दिवस साजरा करण्यात येतो. कार्यक्रमाची सुरुवात सर्वप्रथम ग्रंथपाल उदय खोंडे यांनी आजच्या दिवसा विषयी विद्यार्थ्यांना माहिती दिली व आपल्या ग्रंथालया मध्ये सर्व प्रकारचे पुस्तके उपलब्ध आहे तरी विद्यार्थ्यांनी ते वाचावे असे सुचविले, तसेच कार्यक्रमाला लाभलेले प्रमुख पाहुणे प्रा .निखिल घाडगे यांनी विद्यार्थ्यांमध्ये वाचन नियमित असावं असे सांगितले व आपल्या ग्रंथालयाचा जास्तीत जास्त उपयोग घ्यावा असे आवाहन केले तसेच प्रा. राम विघे यांनी विद्यार्थ्यांना पुस्तके हेच आपले खरे मित्र आहेत, आपण नियमित वाचन केल्यास



व्यक्तिमत्व विकास होतो, आपल्या शब्दाचा संग्रह वाढतो,विचार क्षमता वाढते तरी विद्यार्थ्यांनी किमान दररोज घरी आलेला वर्तमान पत्र वाचण्याची सवय लावावी.

आर्किटेक्चर चतुर्थ वर्षाचा विद्यार्थी साहिल सानप याने विद्यार्थ्यांनी वाचनालयात येऊन पुस्तके वाचावे असे नमूद केले.

याप्रसंगी आपल्या अध्यक्षीय भाषणात प्राचार्य संजय देशमुख यांनी विद्यार्थ्यांना भारतरत्न एपीजे अब्दुल कलाम यांनी अतिशय बिकट परिस्थितीमध्ये आपले शिक्षण पूर्ण केले व भारताला अनेक क्षेपणास्त्रा चा शोध लावला ते नेहमी विद्यार्थ्यांना सांगत होते की आपण सतत पुस्तके वाचावीत व नवनवीन शोध लावावे जेणेकरून भारतामध्ये उत्कृष्ट वैज्ञानिक तयार होतील प्राचार्य संजय देशमुख यांनी विद्यार्थ्यांना व प्रमुख पाहुण्यांना पुस्तके भेट दिली. कार्यक्रमाला उपप्राचार्य प्रा अमित गाडगे ,प्रा स्नेहल विधळे प्रा. तृप्ती भामकर , प्रा.अंकुश खंडारे , प्रा.भूपेंद्र जयस्वाल , प्रा.पलाश अग्रवाल उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्राध्यापक तृप्ती भामकर यांनी केले.

आपल्या परिसरातील बातम्या, लेख, यशोगाथा, जाहिरात तुम्ही आमच्या मेल वर पाठवू शकता prajasattaknews.24gmail.com, arunjoshi.ucn@gmail.com या मेल वर पाठवा आमचा अंक तुम्हाला अगदी मोफत मिळवायचा असेल तर आम्हाला मेल करा तुमचा व्हाट्सअप नंबर
सांध्य दैनिक विदर्भ प्रजासत्ताक RNI NO-M-HM-R 2023/84526-प्रिंट / **PDF** / वेब - पोर्टल /ई - पेपर

https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on

क्यु आर कोड स्कॅन करा ग्रुप ला जॉइन व्हा

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. १६ ऑक्टोंबर २०२५

शहर/ग्रामिण

# रा. सू. गवई स्मारक उद्घाटनासाठी सज्ज

## अमरावतीत उभे राहिले भव्य स्मारक, जिल्हाधिकाऱ्यांकडून कामाचा आढावा





**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती,** रा. सू. उपाख्य दादासाहेब गवई यांच्या स्मारकाचे काम गतीने पूर्ण करण्यात आले आहे. दादासाहेबांचा पुतळा, संग्रहालय आणि सभागृहाचे काम पूर्णत्वास आले असून हे भव्य स्मारक उद्घाटनासाठी सज्ज झाले आहे. जिल्हाधिकारी आशिष येरेकर यांनी आज स्मारकस्थळी भेट देऊन सुरू असलेल्या कामाची पाहणी केली. तसेच स्मारकाबाबत महत्वपूर्ण सुचना केल्या. दादासाहेब गवई यांच्या स्मारकाचे उद्घाटन दि. ३० ऑक्टोबर रोजी नियोजित आहे. उद्घाटनाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अजित पवार यांच्यासह उच्च न्यायालयाचे न्यायमूर्ती उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे हा कार्यक्रम भव्यदिव्य होणार आहे.उद्घाटनाच्या अनुषंगाने सर्व परवानगी आणि ना-हरकत प्रमाणपत्र घेण्यात आले आहेत. तसेच उद्घाटन कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. स्मारक ठिकाणी वीज, पाणी आणि स्वच्छतेची कामे प्राधान्याने करण्यात आली आहेत. याबाबींचा सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. वीज वितरण सुरळीत सुरू राहावी, पाण्याचा पुरवठा व्यवस्थित राहावा, तसेच स्वच्छतेसाठी मनुष्यबळ नेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी श्री. येरेकर यांनी केल्या. यावेळी जिल्हाधिकारी यांनी घेतलेल्या बैठकीत देण्यात आलेल्या सुचनांचा आढावा घेण्यात आला. वीज जोडणी आणि त्याचे देयक, पाणी पुरवठा योग्य दाबाने होण्यासाठी करण्यात आलेल्या उपाययोजनांची माहिती घेण्यात आली. स्मारकाचे योग्य देखभाल होण्यासाठी याठिकाणी तीन व्यक्तींची नेमणूक करण्यात येणार आहे. त्यांच्याकडून इमारत आणि परिसराची देखभाल करण्यात येणार आहे. तसेच त्यांच्याकडून दादासाहेब गवई यांच्याबद्दल माहिती देण्यात येईल. महापालिकेने दोन पाळीमध्ये चार सुरक्षा रक्षक नेमण्याच्या सुचना यावेळी देण्यात आल्या. उद्घाटन समारंभाला महत्वाच्या व्यक्ती उपस्थित राहणार असल्याने याठिकाणी सुरक्षा व्यवस्थेचे नियोजन करावे. तसेच नागरिकही मोठ्या संख्येने उपस्थित राहणार असल्याने त्यांच्यासाठी वाहनतळाची सुविधा करावी. कार्यक्रमाला न्यायिक अधिकारी उपस्थित राहणार असल्याने त्यांच्यासाठी वाहनतळाची स्वतंत्र व्यवस्था करण्याच्या सुचना पोलिस विभागाला यावेळी देण्यात आल्या. दादासाहेब गवई यांचा जीवनपट येथे येणाऱ्या नागरिकांना कळावा, यासाठी चित्रफिती तयार करण्यात याव्यात. तसेच त्यांच्या उपयोगातील वस्तू याठिकाणी ठेवण्यात याव्यात, अशा सूचना करण्यात आल्या.

भेटी दरम्यान निवासी उपजिल्हाधिकारी अनिल भटकर, मुख्य अभियंता गिरीश जोशी, कार्यकारी अभियंता प्रतिक गिरी, पोलिस उपायुक्त गणेश शिंदे आदी अधिकारी उपस्थित होते.

# प्रलंबित वाढीव टप्पे मंजूर करा

## चंद्रशेखर भोयर यांनी केली मागणी

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन सादर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती–** शिक्षकांना भेडसावणाऱ्या विविध समस्या व मागण्या संदर्भात शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्षव भाजप शिक्षक आघाडीचे प्रदेश सहसंयोजक चंद्रशेखर भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना साकडे घालत निवेदन सादर केले.

प्रलंबित वाढीव टप्पे मंजूर करावेत आणि वेतन आयोगाचे थकीत हप्ते थेट शिक्षकांच्या खात्यात जमाकरावे अशी महत्त्वपूर्ण मागणी निवेदनाच्या माध्यमातून करण्यात आली. शिक्षक महासंघाचे संस्थापक अध्यक्ष व भाजपा शिक्षक आघाडीचे प्रदेश सह-संयोजक चंद्रशेखर भोयर हे वाशिम, यवतमाळ, बुलढाणा आणि जालना जिल्ह्यांतील शिक्षक संवाद दौऱ्यावर असताना असंख्यशिक्षक व शिक्षकेतर बांधवांची प्रत्यक्ष भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणून घेतल्या.या संवादांमध्ये सैनिकी अंशतः अनुदानित शाळांना सन २०१९ पासून प्रलंबित असलेले वाढीवटप्पे तत्काळमंजूर करावेत तसेच जीपीएफ, एनपीएस, डीसीपीएस खाते नसलेल्या शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारीयांच्या ६ वा व ७ व्या वेतन आयोगाचे थकित हफ्ते थेट त्यांच्या वेतन खात्यात जमा करण्यात यावेत, असे दोन महत्त्वाचे मुद्दे शिक्षकांनी ठळकपणे उपस्थित केले. शिक्षक बांधवांच्या या न्याय्य मागण्यांची तत्काळ दखल घेत चंद्रशेखर भोयर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे अधिकृत निवेदनाद्वारे दोन्ही प्रश्नांवर लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घेण्याची मागणी केलीतसेचयाप्रत्यक्ष भेटघेऊन संदर्भातील निवेदन सादर केले. या दोन्ही मागण्यांवर संबंधित विभागाने तातडीने कार्यवाही करावी असे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले.–

## सिद्धार्थनगरातून चायना मांजा जप्त



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६ अमरावती** स्थानिक सिध्दार्थनगर येथील सिव्हिल लाईन येथील एका इसमाच्या घरातून ३० हजार रूपये किमतीचा प्रतिबंधित चायना मांजा जप्त करण्यात आला. बुधवारी ही कारवाई करण्यात आली.रवींद्र लल्लुसिंग चव्हाण (वय ५२, रा. सिद्धार्थनगर, सिव्हिल लाईन, अमरावती), असे संबंधित व्यक्तीचे नाव आहे. त्याच्या राहत्या घरातून एका खाकी बॉक्समधून प्रतिबंधित चायना ठेवण्यात आलेला होता. तो घरून मांजा विक्री करीत असल्याची माहिती पोलिसाना प्राप्त झाली होती. त्याच्या ताब्यामधून ३० नग मोनोफिल गोल्ड कंपनीचे प्रतिबंधित चायना मांजा किंमत अंदाजे ३० हजार रुपये, असा मुद्देमाल जप्त व त्याच्याविरुद्ध गाडगेनगर ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला.

# दिवाळीनिमित्त शहरात राहणार कडेकोट पोलीस बंदोबस्त

## वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यावर भर



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती** दिवाळीनिमित्त शहरात पोलिसांचा कडेकाट बंदोबस्त राहणार आहे. बाजारपेठेत खरेदीसाठी नागरिकांची वर्दळ वाढणार असल्याने वाहतूक व्यवस्था सुरळीत ठेवण्यावर पोलिसांचा विशेष भर राहणार आहे. यासाठी पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी बुधवारी पोलीस आयुक्तालयातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन याबाबत सूचना केल्या. दिवाळीच्या खरेदीसाठी अमरावतीकर मोठ्याप्रमाणात बाजारपेठेत गर्दी करणार आहे. यातच राजकमल ते रेल्वेस्टेशनकडे जाणारा उड्डाणपूल वाहतुकीसाठी बंद करण्यात आला आहे. त्यामुळे शहरात वाहतुकीची कोंडी होऊ नये याकडे वाहतूक पोलिसांनी विशेष काळजी घ्यावी. तसेच दिवाळीनिमित्त पूजेसाठी घरातील देव्हाऱ्यात मौल्यवान वस्तू ठेवल्या जातात. त्यावर डल्ला मारण्यासाठी चोरट्यांकडून घरफोडीच्या घटना घडू शकतात. यासाठी रात्र गस्त वाढविण्याच्या सूचना पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी दिल्या. कोणतीही अप्रिय घटना घडणार नाही याची काळजी घेण्याच्या यावेळी सूचना देण्यात आल्या.

# बोगस बी-बियाणे व खत पुरवठादार कंपन्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून ब्लॅकलिस्ट करा- आ.रवी राणा



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६मुंबई** महाराष्ट्र विधानभवनात कृषी व पदुम विभागाशी संबंधित २६ प्रलंबित आश्वासनांवर चर्चा करण्यासाठी आश्वासन समितीची बैठक आमदार रवी राणा यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. शेतकऱ्यांना वेळेवर विमा भरपाई न देणाऱ्या १७ पीकविमा कंपन्यांवर कारवाईचे निर्देश देण्यात आले असून, स्कायमेट कंपनीवर दीड कोटींची दंडात्मक कारवाई करण्यात आली. संबंधित कंपन्यांना साक्षीसाठी तात्काळ नोटीस बजावण्यात आली आहे.

बैठकीत बोगस बी-बियाणे व खत पुरवठा करणाऱ्या कंपन्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करून त्यांना ब्लॅकलिस्ट करण्याचे आदेश देण्यात आले. चुकीच्या हवामान अंदाजांमुळे शेतकऱ्यांना झालेल्या नुकसानीच्या पार्श्वभूमीवर, हवामान खात्याच्या यंत्रणांची कार्यक्षमता तपासण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांकडून अहवाल मागवण्यात आला.तसेच ठिबक सिंचन योजनेसाठी अनुदानवाढ करण्याचे सूचनाही देण्यात आल्या. या निर्णयांमुळे राज्यातील शेतकरी आणि सामान्य नागरिकांना दिलासा मिळणार असून, पीकविमा योजनेतील पारदर्शकता आणि अंमलबजावणीला गती मिळणार आहे.बैठकीस विविध विभागांचे सचिव, संचालक व समिती सदस्य आमदार उपस्थित होते.

# ५.६० लाखांचे एमडी ड्रग्ज जप्त, एकाला अटक

## शहर गुन्हे शाखेची कारवाई



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती–** स्थानिक महेंद्र कॉलनी परिसरातील पांढरीचा हनुमान मंदिराजवळून एमडी ड्रग्ची विक्रीसाठी आलेल्या एका युवकाला शहर गुन्हे शाखेच्या पथकाने अटक केली. त्याच्या ताब्यातून ५ लाख ६० हजार रूपये किंमतीचे एमडी ड्रग्ज जप्त करण्यात आले. बुधवारी (दि.१५) दुपारी ही कारवाई करण्यात आली.अब्दुल राजिक अब्दुल ताहीर (वय ३२, रा. अलहिलाल कॉलनी, अमरावती), असे अटक करण्यात आलेल्या युवकाचे नाव आहे. अब्दुल राजिक हा मोपेड दुचाकी वाहनाने एमडी ड्रग्ज विक्रीसाठी महेंद्र कॉलनी परिसरातील पांढरीचा हनुमान मंदिराच्या बाजुला येत असल्याची माहिती पोलिसांना प्राप्त झाली होती. त्यानुसार शहर गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वात सहायक पोलीस निरीक्षक मनीष वाकोडे, सतीश देशमुख, फिरोज खान, अजय मिश्रा, सुरज चव्हाण, शेख नाझीम, रणजित, वेतन कराळे, सागर ठाकरे यांच्या पथकाने घाड घालून अब्दुल राजिक याला अटक केली. त्याच्या ताब्यातून ५ लाख ६० हजार रूपये किमतीचे एमडी ड्रग्ज, मोपेड वाहन, मोबाईल असा मुद्देमाल जप्त करण्यात आला

# प्रभाग क्रमांक १३ चे नाव अंबापेठ गौरक्षण नमूना घोषित

## तुषार वानखडे यांनी केलेल्या प्रयत्नांना यश

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती–** अमरावती महानगर पालिकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर झालेल्या प्रभाग रचनेमध्ये तुषार वानखडे यांनी केलेल्या प्रयत्नांना यश आले आहे. त्यांनी प्रभाग क्र. १३ अंबापेठ-गौरक्षण या प्रभागाच्या नावामध्ये 'नमुना' भागाचे नाव समाविष्ट करण्याची मागणी केली होती. त्यांच्या आक्षेपावर जिल्हाधिकारी कार्यालयात झालेल्या सुनावणीदरम्यान त्यांनी मांडलेल्या युक्तीवादानुसार अखेर या प्रभागाचे नाव 'अंबापेठ-गौरक्षण-नमुना' असे करण्यात आले आहे.जिल्हाधिकारी व महापालिका आयुक्त यांच्या उपस्थितीत झालेल्या या सुनावणीत तुषार वानखडे यांनी नमूद केले की, नमुना भागातील नागरिकांना अनेक वर्षांपासून प्रभागाच्या नावात आपल्या भागाचा समावेश व्हावा, अशी अपेक्षा आहे. कारण नमुना भाग हा अमरावती शहरातील ऐतिहासिक गावठाण असून, येथून आजवरसहा नगरसेवक महानगरपालिकेत निवडून गेले आहेत. तसेच हा भाग शहरातील मुख्य बाजारपेठ आणि अमरावतीतील पहिली मॉडेल कॉलनी म्हणूनही ओळखला जातो. यासर्व बाबींचा सविस्तर उल्लेख करीत तुषार वानखडे यांनी प्रभावी मांडणी केली. त्यानंतर त्यांचा आक्षेप ग्राह्य धरत प्रभागाचे नवीन नाव 'अंबापेठ-गौरक्षण-नमुना' असे घोषित केले. या निर्णयामुळे नमुना भागातील नागरिकांमध्ये समाधान आणि आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.तुषार वानखडे हे सन २०१२ पासून भारतीय जनता पक्षाशीएकनिष्ठपणे जोडलेले असून, त्यांनी आतापर्यंत अनेक जबाबदाऱ्या यशस्वीपणे पार पाडल्या आहेत. ते भाजयुमो अमरावती शहराचे उपाध्यक्ष, भाजपा ओबीसी मोर्चा अमरावती शहराचे उपाध्यक्ष, अंबा मंडळाचे सरचिटणीस, तसेच भाजपा शहर कार्यकारिणीचे सदस्य, बुथ प्रमुख, शक्तीकेंद्र प्रमुख, आणि अमरावती पदवीधर विधानपरिषद निवडणुकीचे विस्तारक म्हणून कार्यरत राहिले आहेत. तुषार वानखडे यांच्या प्रयत्नांमुळे दीर्घकाळापासून प्रलंबित असलेली मागणी पूर्ण झाल्याबद्दल आनंद व्यक्त केला जात आहे.



# अवकाळीची शक्यता, १३ जिल्ह्यांना यलो अलर्ट; कोणत्या दिवशी, कुठे कोसळणार...

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती**राज्यातून मान्सून माघारी परतत असतानाच रायगड, रत्नागिरी, पुणे, सातारा, नाशिक, अहिल्यानगर, बीड, धाराशिव, लातूर, जालना, छत्रपती संभाजीनगर, धुळे आणि जळगाव या जिल्ह्यांना भारतीय हवामान विभागाने गुरुवारी 'यलो अलर्ट'चा इशारा दिला आहे. तर मुंबईत गुरुवार, शुक्रवार व शनिवारी पावसाची शक्यता आहे.

पावसाची शक्यता कधी आणि कुठे?

धुळे, नाशिक, अहिल्यानगर, पश्चिम छत्रपती संभाजीनगर, पूर्व अमरावती, बुलढाणा, अकोला, सह्याद्री घाटमाथा व रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग

शुक्रवारी : बुलढाणा, धुळे, नाशिक सह्याद्री घाटमाथा, सिंधुदुर्ग, सातारा, सांगली, कोल्हापूर, सोलापूर, छत्रपती संभाजीनगर, हिंगोली


शनिवार : सह्याद्री घाटमाथा, अहिल्यानगर, सोलापूर, नांदेड, लातूर, बीड, धाराशिवरविवार : नाशिक, अहिल्यानगर, छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड, लातूर, धाराशिव, सोलापूर, नांदेड, परभणी, अकोला, चंद्रपूर, गडचिरोलीदरवर्षी मान्सून साधारणत: देशाभरातून १५ ऑक्टोबरदरम्यान बाहेर पडतो. एक-दोन दिवसांत देशाच्या उर्वरित ५ टक्के भूभागावरून मान्सून काढता पाय घेईल. २० ऑक्टोबर पर्यंत महाराष्ट्रात ढगाळ वातावरण राहणार असून तुरळक ठिकाणी किरकोळ पाऊस पडेल, अशी माहिती हवामान तज्ज्ञ माणिकराव खुळे यांनी दिली.

# नवीन निविदा प्रक्रिया, साफसफाई स्वच्छता कंत्राट वांद्यात?

## प्रक्रिया सुरु ठेवा, पण वर्क ऑर्डर नको !

### हायकोर्टाचे मनपा प्रशासनाला आदेश

### ११ नोव्हेंबरला हायकोर्टात सुनावणी



**विदर्भ प्रजासत्ताकदि.१६अमरावती** महानगर पालिकेने अमरावती शहर स्वच्छ करण्यासाठी, कचरा गोळा करण्यासाठी आणिकंपोस्ट डेपोमध्ये नेण्यासाठी आणि घनकचऱ्याचे व्यवस्थापन करण्यासाठी निविदा प्रसिद्ध केली होती. मंगळवारला ७ कंपन्यांसोबत प्री-बिड मिटींग झाली. मात्र दरम्यान, सध्या साफसफाईचे झोन निहाय कंत्राट असलेल्या पैकी एक श्री नागरिक सेवा सहकारी संस्थेने नवीन निविदा प्रक्रियेविरोधात थेट हायकोर्टात धाव घेतली. या याचिकेची दखल घेत बुधवार १५ ऑक्टोबरला हायकोर्टाने मनपाला निविदा प्रक्रिया राबविण्याची मुभादिली, पणवर्क ऑर्डरदेवूनये, असेबजावले. त्यामुळे आता निविदा प्रक्रिया न्यायालयीन निर्णयाच्या अधीन झाल्याने नवीन प्रभाग निहाय साफसफाई स्वच्छता कंत्राट तूर्त हायकोर्टाच्या चक्रव्युहात अडकले आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी ११ नोव्हेंबरला होणार आहे.सध्या साफसफाईचे कंत्राट दिलेल्या ठेकेदारांचे काम सुरु आहे. त्यांना पाच वर्षासाठी साफसफाईचे कंत्राट दिले होते. विशेष म्हणजे दोन वर्षचयाझोन निहाय साफसफाई कंत्राटालाझाले. तीन वर्षे शिल्लक असताना अचानक मनपाने नव्याने निविदा प्रक्रिया राबविणे सुरु केल्यामुळेया निर्णयाविरोधात पाच झोनमधील तीन ठेकेदारांपैकी एक असलेल्या (झोन १ वझोन ५)कंत्राटदार श्री नागरिक सेवा सहकारी संस्थेचे संचालक राजेश गुप्ता यांनी हायकोर्टात याचिका दाखल केली. या याचिकेवर बुधवारला न्यायमूर्ती अनिल किलोर आणि न्यायमूर्ती रजनीस व्यास यांच्या दोन सदस्यीय खंडपीठाने महानगरपालिकेच्या नवीन निविदा प्रक्रियेला मोठा धक्का दिला आहे.

मनपाने निविदा प्रक्रिया राबविणे सुरु ठेवावी. मात्र कामाची वर्क ऑर्डर पुढील आदेशापर्यंत देवू नये, असे स्पष्ट शब्दात बजावले. सोबतच या प्रकरणाची पुढील सुनावणी ११ नोव्हेंबरला ठेवली आहे. त्यामुळे आता मनपाची प्रभागनिहाय साफसफाई निविदा प्रक्रिया हायकोर्टाच्या चक्रव्युहात अडकली आहे.

# विदर्भ, मराठवाडा, खानदेशात जाणाऱ्या गाड्यांचे आरक्षण फुल्ल

## पुण्यात नोकरी, शिक्षणानिमित्त बाहेरील राज्यातील राहणाऱ्यांची संख्या जास्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६पुणे–** दिवाळीत गावी जाणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त असते. त्यामुळे राज्य परिवहन महामंडळाकडून विदर्भ, मराठवाडा, खान्देश, कोकण या सर्व भागात पुणे विभागातून ५८९ जादा बस सोडण्यात आल्या आहेत. यातील २५० बसचे आरक्षण फुल झाले आहेत, अशी माहिती एसटी प्रशासनाकडून देण्यात आली. पुण्यात नोकरी, शिक्षण आणि कामानिमित्त बाहेरील राज्यातील राहणाऱ्या नागरिकांची संख्या जास्त आहे. त्यामुळे दिवाळीत पुण्यातून गावी जाणाऱ्या नागरिकांची संख्या जास्त असते. त्यामुळे एसटी, रेल्वेला त्यासाठी रेल्वेचे दोन महिने अगोदरच बुकिंग केले जाते. त्यामुळे रेल्वे बुकिंग दोन महिन्यांपूर्वीच फुल आहे. त्यानंतर रेल्वेने गर्दी कमी करण्यासाठी एकूण २८ विशेष गाड्यांद्वारे ९०० अधिक फेऱ्या चालविण्याचा निर्णय घेतला आहे. या गाड्या लखनौ, दिल्ली, दानापूर, गोरखपूर, नागपूर, लातूर, रत्नागिरी,

अजनीसह देशातील विविध भागांत जाणाऱ्या आहेत. पुणे रेल्वे स्टेशनवरील गर्दी कमी व्हावी म्हणून काही गाड्या हडपसर आणि खडकी टर्मिनल येथून सोडण्याचे नियोजन केले आहे. त्यामुळे गर्दीत प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे.



**विमानांना प्राधान्य–** अनेक कंपन्यांना शनिवारपासून सुट्ट्या आहेत. त्यामुळे आयटी व इतर क्षेत्रातील प्रवाशांनी विमानाचा पर्यायदेखील निवडला आहे. त्यामुळे शुक्रवारी रात्रीपासून, शनिवार, रविवार अशी विमान तिकिटांची मोठी मागणी आहे. त्यामुळे विमान कंपन्यांनी या तीन दिवसांचे तिकीट दर दुप्पट केल्याचे दिसत आहे; पण प्रवासाचा कालावधीत कमी वेळ लागत असल्यामुळे विमान प्रवासाला प्राधान्य देत आहेत.

### मराठवाड्यासह विदर्भ या भागांतून सर्वाधिक बुकिंग

पुण्यातून मराठवाडा आणि विदर्भात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या जास्त असते. एसटीकडून सोडण्यात आलेल्या जादा बसपैकी मराठवाडा आणि विदर्भात जाणाऱ्या बसचे सर्वाधिक बुकिंग फुल झाले. यामध्ये अमरावती, परभणी, वर्धा, नागपूर, नांदेड, बीड, जालना, लातूर, हिंगोली, जळगाव, अकोला या ठिकाणी जाणाऱ्या बसचा समावेश आहे. येत्या काही दिवसांमध्ये आणखी इतर बसचे बुकिंग फुल होईल.

नागरिकांच्या सोयीसाठी पुणे विभागातून ५८९ जादा सोडण्यात आले आहे. बस बुकिंगचे प्रमाण वाढले आहे. गर्दी वाढली तर प्रवाशांच्या सोयीसाठी आणखी बस वाढविण्यात येतील. सुरक्षित प्रवासासाठी नागरिकांनी बसचा वापर करावा. **– अरुण सिया,** विभाग नियंत्रक, पुणे एसटी विभाग

# कुटुंबातील शोक आणि पूरस्थितीमुळे यंदा पवार कुटुंबाचा दिवाळी पाडवा होणार नाही

**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६बारामती,** पवार कुटुंबात दुःखद घटना घडली आहे. शिवाय मराठवाड्यात शेतकरी अडचणीत सापडला आहे. पूरग्रस्त भागात वाईट स्थिती आहे. त्यामुळे यावर्षी पवार कुटुंबीयांचा दिवाळी पाडवा होणार नसल्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी सांगितले.



तसेच याच कारणांमुळे शरद पवारही दिवाळी साजरी करणार नसल्याचे राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रवक्ते अंकुश काकडे यांनी सांगितले.

उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी बुधवारी (दि.१५) येथे पिंपरी येथे पत्रकारांशी संवाद साधला. दरवर्षी बारामती येथे पवार कुटुंबाच्या वतीने दिवाळी पाडवा साजरा होतो. त्यासाठी राज्यभरातून कार्यकर्ते, पवार कुटुंबाचे हितचिंतक येत असतात. मात्र यंदा पाडवा साजरा होणार की नाही, याविषयी संभ्रम होता. तो अजित पवार यांनी दूर केला. ते म्हणाले की, आमच्या कुटुंबात दुःखद घटना घडली आहे. शिवाय मराठवाड्यात शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे यावर्षी पवार कुटुंबीयांचा पाडवा होणार नाही.

उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांनी बुधवारी (दि.१५) येथे पिंपरी येथे पत्रकारांशी संवाद साधला. दरवर्षी बारामती येथे पवार कुटुंबाच्या वतीने दिवाळी पाडवा साजरा होतो.

# विनय ठमके यांचा अमरावतीत रुजू होण्याचा मुहूर्त लांबला

## अकोल्यातून कार्यमुक्त न केल्याने अजूनही तेथेच

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ अमरावती–** जिल्हा परिषदेचे नवे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी (डिशनल सीईओ) विनय ठमके यांचा अमरावतीत रुजू होण्याचा मुहूर्त लांबला आहे. शासनाच्या आदेशानुसार, गेल्या आठवड्यात सोमवारी ते येथे रुजू होण्याची शक्यता होती. मात्र, अकोला जिल्हा परिषदेतून त्यांना अद्याप कार्यमुक्त करण्यात आले नसल्याने ते अजूनही अकोल्यातच आहेत.

राज्य शासनाने १ ऑक्टोबर रोजी काही अधिकाऱ्यांच्या बदल्या केल्या होत्या, ज्यात विनय ठमके यांच्या नावाचाही समावेश होता. त्यांना अकोला जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक या पदावरून अमरावती जिल्हा परिषदेच्या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी पदाची नवी जबाबदारी देण्यात आली आहे. बदली आदेशाला दोन आठवडे उलटूनही ते अमरावतीत पोहोचलेले नाहीत.



सध्या अमरावती जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक प्रीती देशमुख या अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी पदाचा कार्यभार सांभाळीत आहेत. संतोष जोशी यांची कोल्हापूर जिल्हा परिषदेत बदली झाल्यापासून अमरावती जिल्हा परिषदेचे हे पद रिक्त आहे. सुरुवातीचे काही दिवस वगळता, बऱ्याच काळापासून प्रीती देशमुख यांच्याकडेच या पदाची जबाबदारी आहे.

विनय ठमके यांनी यापूर्वीही अमरावती जिल्हा परिषदेत उपमुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून काम केले आहे. त्यामुळे त्यांच्यासाठी हा जिल्हा किंवा कार्यालय नवीन नाही. कर्मचाऱ्यांनाही त्यांच्या आगमनाची प्रतीक्षा आहे. दरम्यान, सर्वत्र निवडणुकांची तयारी सुरू झाली आहे. अशा स्थितीत ते येथे रुजू होतील की ही बदली रद्द होईल, याबाबत विविध तर्कवितर्क लावले जात आहेत. या संदर्भात विनय ठमके यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता, तो होऊ शकला नाही.

# विदर्भातील ३ महामार्गांच्या निविदा भूसंपादनाअभावी रद्द करणार


## नागपूर ते चंद्रपूर, नागपूर ते गोंदिया, भंडारा ते गडचिरोलीसाठी पुन्हा प्रक्रिया

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६नागपूर–** महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाने गेल्या वर्षी काढलेल्या आणखी तीन महामार्ग प्रकल्पांच्या कामाच्या निविदा रद्द केल्या जाणार आहेत. यामध्ये नागपूर ते चंद्रपूर, नागपूर ते गोंदिया आणि भंडारा ते गडचिरोली या तीन महामार्गांचा समावेश आहे. या प्रकल्पांचे भूसंपादन अद्याप झाले नसल्याने निविदा रद्द करून त्या नव्याने मागविण्यात येणार आहेत.

समृद्धी महामार्गाचा विस्तार भंडारा, गोंदिया, चंद्रपूर आणि गडचिरोलीपर्यंत करण्याचा एमएसआरडीसीचा मानस आहे. त्यानुसार नागपूरपासून ते चंद्रपूरपर्यंत समृद्धी महामार्गाच्या धर्तीवर प्रवेश नियंत्रित शीघ्रसंचार महामार्गाची उभारणी केली जाणार आहे. या प्रकल्पांसाठी एमएसआरडीसीने गेल्यावर्षी निविदा काढल्या होत्या. त्यातील नागपूर-चंद्रपूर महामार्गाच्या आर्थिक निविदा या वर्षी जानेवारीमध्ये खुल्या केल्या होत्या. त्यातील नागपूर ते चंद्रपूर प्रकल्पाच्या निविदा २७ टक्के अधिक दराने, तर नागपूर- गोंदिया प्रकल्पाच्या निविदा ४० टक्क्यांहून अधिक दराने आल्या. त्यात या निविदा अधिक दराने आल्याने त्यावर टीकाही झाली होती.

### ४ हजार कोटींचे कर्ज मंजूर



आता या तिन्ही प्रकल्पांच्या भूसंपादनासाठी सुमारे ४ हजार कोटी रुपये लागणार आहेत. या कर्जाला हुडकोने मंजुरी दिली आहे, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

दरम्यान, नागपूर-गोंदिया आणि भंडारा-गडचिरोली या महामार्गांच्या संयुक्त मोजणीचे काम १०० टक्के पूर्ण झाले आहे. त्यामुळे आता भूसंपादन करून प्रकल्पाचे काम सुरू करणे शक्य होणार आहे. भूसंपादनाचा खर्च कर्ज काढून भागवला जाणार आहे. मात्र कर्जाचा तिढा असल्याने, तसेच भूसंपादन रखडल्याने या प्रकल्पाच्या निविदा खुल्या होऊनही काम सुरू होऊ शकले नव्हते. परिणामी या प्रकल्पाच्या कामासाठी कंपन्यांना देकारपत्र देण्यात आले नव्हते, अशी माहिती अधिकाऱ्यांनी दिली.

# मुंबईतल्या प्रहार पक्ष कार्यालयाची जागा रद्द

## पर्यायी जागा न दिल्याने बच्चू कडू संतप्त



**विदर्भ प्रजासत्ताक दि.१६अमरावती –** प्रहार जनशक्ती पक्षाचे अध्यक्ष आणि आमदार बच्चू कडू यांनी राज्य सरकारच्या एका निर्णयावरून भाजपवर जोरदार टीका केली आहे. मुंबईतील नरिमन पॉइंट येथे प्रहार जनशक्ती पक्षाला दोन वर्षांपूर्वी देण्यात आलेले पक्ष कार्यालय राज्य सरकारने रद्द केले आहे. जागा रद्द करताना कोणतीही पर्यायी जागा न दिल्याने बच्चू कडू संतप्त झाले आहेत. या निर्णयावरून त्यांनी जोरदार टीका करत भाजपला 'विष' संबोधले आहे. तसेच भाजपची तुलना ही सापाशी केली आहे.एकनाथ शिंदे यांनी मुख्यमंत्री असताना मंत्रालयाजवळ असलेल्या 'जनता दल सेक्युलर' (गऊड) पक्षाच्या कार्यालयाची जागा कमी करून ती प्रहार जनशक्ती कार्यालयाला उपलब्ध करून दिली होती. फडणवीस सरकारने हा निर्णय बदलला असून, बिहारमधील विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपचा मित्रपक्ष असलेल्या जनता दल सेक्युलरला पुन्हा संपूर्ण जागा परत देण्यात आली आहे. यामुळे एकनाथ शिंदे यांना साथ देणाऱ्या बच्चू कडू यांना मोठा झटका बसला आहे. बच्चू कडू हे गेले काही दिवस महायुतीवर टीका करताना दिसून येत आहे. यामुळे हा निर्णय घेण्यात आल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

# पक्षाकडे लक्ष द्या, तुमच्या कामाचे मूल्यांकन सुरू, भाजपच्या मंत्र्यांना समज



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ मुंबई** पक्षाच्या कामाकडे लक्ष द्या, कार्यकर्त्यांची कामे करा, तुमच्या या कामगिरीचेही मूल्यांकन पक्षपातळीवर केले जात आहे हे लक्षात ठेवा अशी स्पष्ट समज भाजपचे सहसंघटनमंत्री शिवप्रकाश आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी पक्षाच्या मंत्र्यांना दिली.

भाजप मंत्र्यांच्या बैठका या दोन नेत्यांनी मंगळवारी रात्रीपर्यंत प्रदेश कार्यालयात तीन गटांत घेतल्या. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकांसाठी कामांचे टार्गेट पक्षाच्या मंत्र्यांना यावेळी देण्यात आले. अनेक आमदारांच्या मतदारसंघात शासकीय समित्यांवर कार्यकर्त्यांच्या नियुक्त्या अद्याप झालेल्या नाहीत, त्या त्यांनी तातडीने कराव्यात, असे बैठकीत सांगण्यात आले.

### रा. स्व. संघाने घेतली भाजपसह परिवारातील संघटनांची बैठक

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांनी बुधवारी दुपारी येथील यशवंत भवन या मुख्य कार्यालयात भाजपचे निवडक मंत्री आणि संघ परिवारातील संघटनांच्या पदाधिकाऱ्यांची तीन तास बैठक घेतली. भाजपतर्फे बैठकीला प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, केंद्रीय सहसंघटनमंत्री शिवप्रकाश, मंत्री चंद्रकांत पाटील, चंद्रशेखर बावनकुळे, आशिष शेलार, संघाचे सहसरकार्यवाह अतुल लिमये उपस्थित होते. भारतीय संस्कृती व हिंदुत्वाच्या मार्गाने पुढे जाण्यासंदर्भात चिंतन झाले. संघटनेने त्यांच्याकडे असलेले कार्य वाढविणे अपेक्षित आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

निवडणुकांसाठी स्वत:ला झोकून द्या, पक्षांतर्गत कुरबुरी असतील तर त्या मिटवा

अनेक ठिकाणी पक्ष कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांची कामे तातडीने होत नाहीत. आपले सरकार असतानाही कामे तत्काळ होत नसतील तर ते योग्य नाही. प्रत्येक मंत्र्यांनी पक्षाची कामे लवकर होण्याच्या दृष्टीने व्यवस्था तयार करावी असे प्रदेशाध्यक्ष चव्हाण यांनी सांगितले.

पुढचे दोन महिने पूर्णपणे पक्षाला द्या, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांसाठी स्वत:ला झोकून द्या. पक्षांतर्गत कुरबुरी असतील तर त्या मिटवा. पक्षात इच्छुकांची गर्दी आहे. अशावेळी बंडखोरीची शक्यता आहे. ती होणार नाही यासाठी मोर्चेबांधणी करा, असेही यावेळी सांगण्यात आले.

# कांदा कोणाला रडवणार, ऐन दिवाळीत बंफर साठा येणार

## परदेशातून फक्त १० टक्के मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६ नाशिक** प्रमुख कांदा उत्पादक असलेल्या महाराष्ट्र व मध्य प्रदेशात ऐन दिवाळीत कांद्याचे भाव अजून कोसळण्याची शक्यता आहे. दोन्ही राज्यातील शेतकऱ्यांकडे मोठ्या प्रमाणात कांद्याचा साठा उपलब्ध आहे. कर्नाटकातील खरीप कांद्याची काढणी आधीच सुरू झाली आहे. राजस्थान आणि गुजरातमधूनही खरीप हंगामातील कांद्याचा पुरवठा सुरू होण्याची अपेक्षा आहे. या सर्वच परिस्थितीत कांद्याचा बंफर स्टॉक उपलब्ध होणार असल्याने भाव कोसळू शकतात, असे कांदा निर्यातदारांनी सांगितले.

खरीप पीक उशिरा येणार

उशिराचा खरीप कांदा पीक नोव्हेंबरच्या तिसऱ्या आठवड्यात बाजारात येण्याची अपेक्षा आहे, कर्नाटकमधून नोव्हेंबर अखेरपर्यंत पुरवठा सुरू राहील. जुन्या रब्बी साठ्याची नियमित आवक आणि नवीन खरीप पीक यामुळे यावर्षी कांद्याची कमतरता भासणार नाही.



परदेशातून भारताच्या कांद्याची मागणी कमी

सध्या उन्हाळ कांद्याला ९०० ते ९७५ रुपये असा सर्वसाधारण भाव मिळत असल्याने कांदा उत्पादकांच्या डोळ्यात पाणी आहे. त्यात अजून भाव कमी झाले तर कांदा बाजारात अत्यंत अवघड स्थिती होईल.

दुसरीकडे परदेशातून भारताच्या कांद्याची मागणी कमी झाली आहे, ज्यामुळे निर्यातीला वाव नाही. परिणामी, देशांतर्गत बाजारात कांद्याच्या भावात वाढ होण्याची शक्यता नसल्याचे कांदा निर्यातदार संघटनेचे उपाध्यक्ष विकास सिंग यांनी सांगितले.


कांदा बियाण्यांची निर्यातच शेतकऱ्यांच्या मुळावर

कांदा निर्यातदार असोसिएशनचे उपाध्यक्ष विकास सिंह यांनी केंद्र सरकारला कांदा बियाणे निर्यातीवर बंदी घालण्याची मागणी केली आहे.

बांगलादेश, श्रीलंका आणि इतर शेजारी देश भारतीय कांदा बियाण्यांचा वापर करून कांद्याचे उत्पादनकरत आहेत. चीन आणि पाकिस्तानसारख्या देशांमध्येही भारतीय कांद्याच्या बियाण्यांची मागणी वाढत आहे, जी दीर्घकाळात भारतीय शेतकऱ्यांच्या हितासाठी संकट निर्माण करू शकते.

# शेतकऱ्यांना विदेश दौऱ्यासाठी २ लाख रुपये अनुदान

## कृषिमंत्री दत्तात्रय भरणेंनी दिली माहिती, शेतीतील अत्याधुनिक तंत्रज्ञान शिकण्याची संधी



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.१६पुणे–** शेतकऱ्यांना परदेश दौऱ्यासाठी २ लाख रुपयांचे अनुदान देण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला असल्याची माहिती कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. या संदर्भात माहिती देताना भरणे म्हणाले, जगातील सर्वोत्तम शेती तंत्रज्ञान शेतकऱ्यांनी आपल्या शेतात वापरावे यासाठी परदेशी अभ्यास दौऱ्याचे कृषि विभागामार्फत आयोजन केले जाते, अशी माहिती भरणे यांनी दिली आहे.

मंत्री दत्तात्रय भरणे म्हणाले, २०१२ नंतरच्या काळात प्रवास, निवास आणि परकीय चलनातील दरवाढ लक्षात घेता, विद्यमान १ लाख रुपयांच्या मर्यादेत शेतकऱ्यांना पुरेशी मदत मिळत नव्हती. त्यामुळे अनुदान मर्यादा दुप्पट करून २ लाख रुपये करण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. हा निर्णय म्हणजे शेतीला अत्याधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्याचा प्रयत्न आहे.

पुढे बोलताना दत्तात्रय भरणे म्हणाले, या निर्णयामुळे आता देशाबाहेर अभ्यास दौऱ्यासाठी जाणाऱ्या शेतकऱ्यांच्या प्रवास खर्चाच्या ५० टक्के किंवा कमाल २ लाख रुपयांपर्यंत अनुदान देण्यात येईल. त्यामुळे शेतकऱ्यांना अधिक गुणवत्तापूर्ण अनुभव घेता येईल तसेच प्रगत देशांतील शेतीपद्धतींचा अभ्यास करून त्या आपल्या शेतीत राबवण्याची प्रेरणा मिळेल. तसेच ही योजना २००४-०५ पासून कृषी विभागामार्फत राबवण्यात येत आहे.

शेतकऱ्यांना विदेशात जाऊन तेथील आधुनिक तंत्रज्ञान, शेतीतील यशस्वी मॉडेल्स आणि बाजारपेठीय पद्धतींचा अभ्यास करता यावा, यासाठी या निर्णयाची अंमलबजावणी कृषी आयुक्तालय, पुणे यांच्या माध्यमातून करण्यात येईल. योजनेअंतर्गत निवड प्रक्रियेत पारदर्शकता राखण्यासाठी अर्जांची छाननी जिल्हा कृषी अधिकारी, राज्यस्तरीय समित्या आणि कृषी आयुक्त कार्यालयाच्या माध्यमातून केली जाईल, अशी माहिती भरणे यांनी दिली आहे.

शेतकऱ्यांना कोणत्या देशांमध्ये जाता येणार?

महाराष्ट्र शासनाने राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे या महत्त्वाकांक्षी योजनेत महत्त्वपूर्ण बदल केला आहे. शेतकऱ्यांना जागतिक स्तरावरील प्रगत कृषी तंत्रज्ञान, प्रक्रिया उद्योग, बाजारपेठ विस्तार आणि उत्पादनवाढीच्या नवीन पद्धतींचे प्रत्यक्ष ज्ञान मिळावे या उद्देशाने राबवण्यात येणाऱ्या या योजनेत आता प्रति शेतकरी अनुदानाची कमाल मर्यादा १ लाखांवरून वाढवून २ लाख रुपये इतकी करण्यात आली आहे.

कृषी विभागाने याबाबतचा शासन निर्णय जारी केला असून, या बदलामुळे राज्यातील शेतकऱ्यांना अमेरिका, इस्रायल, जपान, ऑस्ट्रेलिया, नेदरलँड्स, फ्रान्स, थायलंड यांसारख्या देशांमधील शेतीतील नवकल्पना, सिंचन तंत्र, पिक उत्पादन व्यवस्थापन, कृषी प्रक्रिया आणि निर्यातक्षम शेतीपद्धती यांचा अधिक प्रभावीपणे अभ्यास करणे शक्य होणार आहे.

# संत्र्याबाबतचे सरकारी धोरण कुचकामी बदल घडवण्यासाठी उठावाची गरजेचा

## संत्रा उत्पादक परिषदेचा निर्णय दोन खासदार, आंध्र प्रदेशच्या पदाधिकाऱ्यांची उपस्थिती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

संत्र्याबाबतचे सरकारी धोरण हे अत्यंत कुचकामी आहे. ते बदलण्यासाठी उठाव करावाच लागेल. त्यासाठीच्या तयारीला आतापासून लागण्याचे आवाहन आज, बुधवारी पार पडलेल्या संत्रा उत्पादक परिषदेत करण्यात आले. भारतीय कम्युनिस्ट पक्षाच्या नेतृत्वातील अखिल भारतीय किसान सभेच्या अमरावती जिल्हा शाखेने परिषदेचे आयोजन करण्यात आले होते.




श्री शिवाजी शिक्षण संस्थेच्या मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृहात आयोजित परिषदेचे उद्घाटन स्व. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड. निलेश हेलोंडे यांनी केले. मंचावर अमरावतीचे खासदार बळवंतराव वानखडे, वर्ध्याचे खासदार अमर काळे, किसान सभेचे राष्ट्रीय अध्यक्ष राजन क्षीरसागर, प्रदेशाध्यक्ष हिरालाल परदेशी, आंध्र प्रदेशचे पुढारी व्ही. व्ही. प्रसाद, ज्येष्ठ कम्युनिस्ट नेते तुकाराम भस्मे, संत्रा बागायतदार संघटनेचे अध्यक्ष ड. धनंजय तोटे, जिल्हा परिषदेचे माजी सदस्य संजय मंगळे, प्रा. महेंद्र मेटे, शाहीर धम्मा खडसे, प्रा. अरविंदराव वानखडे उपस्थित होते.

परिषदेच्या उद्घाटन सत्रात राजन क्षीरसागर आणि व्ही. व्ही. प्रसाद यांचे बीजभाषण झाले. त्यांनी संत्रा उत्पादकांसोबतच शेतकऱ्यांची एकूणच दुरवस्था मांडली. कृषी प्रधान देश असला तरी देशभरात कृषीची कशी वाताहत झाली आहे, याचा आलेख त्यांनी यावेळी मांडला. दोघांच्याही मांडणीतून पेरणीपासून ते कापणीपर्यंतचे आणि शेती मशागतीपासून ते शेतीपिकांच्या बाजारपेठेपर्यंतचे मुद्दे स्पष्ट झाले. पीक विमा कंपन्यांनी केलेले घोळही त्यांच्या नजरेतून सुटले नाहीत. महाराष्ट्रात संत्रा उत्पादकांची जशी स्थिती आहे, तशीच विदारक अवस्था आंध्र प्रदेशात आंब्याची आहे. त्यामुळे सर्व फळपिक घेणाऱ्या शेतकऱ्यांनी एकसंघ होऊन हा लढा पुढे नेला पाहिजे, असे मत व्ही. व्ही. प्रसाद यांनी मांडले.

उद्घाटनपर भाषण करताना ड. हेलोंडे यांनी आपले विचार मांडले. संत्रा उत्पादकांसह सर्व शेतकऱ्यांची होत असलेली वाताहत लक्षात घेता किसान सभेने संघर्षाची धार अधिक तीव्र करावी, असे आवाहन भस्मे यांनी केले. त्यात सक्रीय सहभागाची हमीही दिली. स्वागतपर भाषणात प्रा. साहेबराव विधळे यांनी देशपातळीवर संघर्षाशिवाय पर्याय नाही, हे बिंबविले. संचालन प्रा. डॉ. ओमप्रकाश कुटेमाटे यांनी केले. प्रास्ताविक किसान सभेचे सरचिटणीस अशोक सोनारकर यांनी केले.

ठरावांबाबत खासदारांची हमी खासदार बळवंतराव वानखडे यांनी परिषदेने पारित केलेल्या ठरावांशी सहमती दर्शवून आगामी हिवाळी अधिवेशनादरम्यान संत्रा उत्पादकांची बाजू मांडण्याचे अभिवचन दिले. त्याचवेळी खासदार अमर काळे यांनी किसान सभेच्या प्रतिनिधीमंडळाची देशाचे माजी कृषी मंत्री शरद पवार यांची भेट घालून देण्याचे आश्वासन दिले.

# विविधरंगी रांगोळ्यांनी बाजारपेठ सजली

## रांगोळी काढण्याच्या पद्धतीही बदलल्या



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

दिवाळीनिमित्त बाजारपेठा विविध साहित्यांची सजल्या आहेत. यात सणानिमित्त प्रत्येक घरासमोर काढण्यात येणाऱ्या रांगोळीची विविध स्टॉल लावण्यात आले आहेत. दिवाळीत आहे. प्रत्येक घरासमोर काढण्यात येणाऱ्या रांगोळीमुळे घराला एक वेगळीच शोभा प्राप्त होत असते. त्यामुळे यंदा दरवर्षीप्रमाणे विविधरंगी रांगोळी आणि तयार रांगोळी छापे विक्रीस आले आहेत. विविध रंगांमुळे रांगोळीच्या रंगांची जणू बाजारात उधळण होत असल्याचे भासत आहे. अमरावती शहरात यावर्षी दिवाळीनिमित्त ३ टन रांगोळीची विक्री होण्याची अपेक्षा रांगोळी काढण्याची परंपरा कायम आहे. रांगोळीच्या रंगांनी दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्याचा प्रयत्न नागरिकांकडून केला जातो. त्यानिमित्त बाजारपेठेत विविधरंगी रांगोळी विक्रीस दाखल झाली आहे. मोठमोठ्या दुकानांसह फेरीवाले, व्यावसायिकांकडून रांगोळी आणि रांगोळीचे तयार छापे विक्री केले जातात. लाल, हिरवा, पिवळा, नारंगी आहे.घराच्या अंगणाची स्वच्छता करून रांगोळी काढण्याची परंपरा कायम आहे. रांगोळीच्या रंगांनी दिवाळीचा आनंद द्विगुणित करण्याचा प्रयत्न नागरिकांकडून केला जातो. त्यानिमित्त बाजारपेठेत विविधरंगी रांगोळी विक्रीस दाखल झाली आहे. मोठमोठ्या दुकानांसह फेरीवाले, व्यावसायिकांकडून रांगोळी आणि रांगोळीचे तयार छापे विक्री केले जातात. लाल, हिरवा, पिवळा, नारंगी,पांढरा, जांभळा आदी विविध रंगाच्या रांगोळीची बाजारपेठेत जणू उधळण होत असल्याचे भासत आहे.दिवाळीनिमित्त महिला वर्गाकडून मोठ्या प्रमाणात रांगोळी खरेदीसाठी गर्दी केली जाते. यात होलसेल बाजारात पांढरी रांगोळी १० रुपये, तर रंगीत रांगोळी २० रुपये किलो या दराने विक्री होत आहे. त्याचप्रमौणे नक्षीकाम असलेले रांगोळी छापे १० ते २ हजार रुपयांपर्यंत विक्री होते.

**नक्षीकामाचे विविध साचे विक्रीस**

शुभ-लाभ, श्री गणेश, लक्ष्मी पाऊले, तिरुपती बालाजी, कासवा तसेच विविध नक्षी रेखाटलेल्या नायलॉन, लाकडी छाप्यांची वापर रांगोळी काढण्यासाठी होत आहे. त्याचबरोबर प्लायवूडच्या सहाय्याने तयार केलेले रांगोळी साचेही बाजारपेठेत विक्रीस आले आहेत.

# वापरात नसलेल्या जुन्या वस्तू 'आरआरआर' सेंटरला दान द्या



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

'स्वच्छ सर्वेक्षण २०२५'च्या अनुषंगाने महानगरपालिकाद्वारा अंबिका नगर येथील मनपा शाळेत 'रिड्यूस, रियूज आणि रिसायकल' (आरआरआर) सेंटरचे उद्घाटन १५ ऑक्टोबर रोजी महानगरपालिका आयुक्त सौम्या शर्मा यांच्या हस्ते करण्यात आले. विशेष म्हणजे आयुक्तांनी त्यांच्या घरातील वापरात नसलेली जुनीभांडी प्रातिनिधिक स्वरूपात या केंद्रात जमा करून उपक्रमाची सुरुवात केली. त्यामुळे नागरिकांनीही त्यांच्या घरातील जुन्या पण गरजूंना वापरता येणाऱ्या वस्तू या केंद्रात आणून देण्याचे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

नागरिकांनी त्यांच्या घरातील वापरात नसणाऱ्या पण वापरण्यायोग्य असलेल्या वस्तू या केंद्रात आणून देणे अपेक्षित आहे. त्या वस्तू गरजू नागरिकांसाठी विनामूल्य उपलब्ध करून दिल्या जातात. जुने पण चांगल्या स्थितीतील कपडे, शालेय साहित्य, वापरण्यायोग्य खेळणी,घरगुती साहित्य, वापरलेले पण चांगल्या स्थितीतील पादत्राणे, जुन्या पण कार्यक्षम सायकली, संगणक/मोबाइल (जर दुरुस्त करता येतील) तसेच इतर कोणत्याही दैनंदिन उपयुक्त वस्तूटाकून न देता त्यांचा पुनर्वापर केल्याने कचरा कमी होतो. अशा वस्तू गरजूंना मिळाल्यास समाजात पुनर्वापराची सवय वाढते, वस्तूंचा योग्य प्रकारे पुनर्वापर झाल्याने वस्तूंचे आयुष्य वाढते. कचऱ्याचेप्रमाण कमी होते,

> आपल्या घरातील चांगल्या स्थितीतील न वापरलेल्या वस्तू आरआरआर सेंटरमध्ये आणाव्यात, जेणेकरून त्या वस्तू गरजू व्यक्तींना उपयोगी पडतील. गरजू नागरिकांनीही आवश्यक वस्तू मोफत घेऊन जावे. हा उपक्रम सामाजिक बांधिलकी, पर्यावरण रक्षण आणि स्वच्छतेच्या दृष्टीने राबविला जात आहे.
>
> **सौम्या शर्मा,**
> **आयुक्त तथा प्रशासक महापालिका.**

त्यामुळे शहर अधिक स्वच्छ व सुंदर होण्यासाठी हातभार लागतो, अशी माहिती प्रशासनाने दिली.आपल्याला या तत्त्वांनुसार आयुक्तांनी सांगितले की, कचरा कमी करण्यासाठी आणि पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठीजगणे आवश्यक आहे. आपल्या छोट्या-छोट्या कृतींमधून आपण शहराला स्वच्छ, हरित आणि टिकाऊ बनवू शकतो. अतिरिक्त आयुक्त शिल्पा नाईक, उपायुक्त डॉ. मेघना वासनकर, तसेच सर्व विभाग प्रमुख आणि कर्मचारी उपस्थित होते.




# श्री राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सवामध्ये गजानन काकडे ग्रामगीताचार्य पदवीने सन्मानीत



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

नुकताच राष्ट्रसंत तुकडोजी महाराज पुण्यतिथी महोत्सव श्री गुरुकुंज आश्रम येथे पार पडला. या कार्यक्रमामध्ये जिल्हा परिषद पूर्व माध्यमिक शाळा सालोरा बु.पं.स.तिवसा शाळेचे मुख्याध्यापक सुप्रसिद्ध कवी,डमनीकार, श्री गजानन काकडे यांना ग्रामगीताचार्य पदवीने सन्मानित करण्यात आले.

नुकताच त्यांना जिल्हा परिषद अमरावतीचा जिल्हा आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झाला आहे.तसेच त्यांच्या डमनी या काव्यसंग्रहाची निवड राज्यातील शासकीय ग्रंथालयामध्ये झाली आहे. या बद्दल राष्ट्रसंत शिक्षक कॉलनी अमरावती तर्फे नुकताच त्यांचा सत्कार करण्यात आला. सत्कार सोहळयाचे अध्यक्षस्थानी अमरावती पाटबंधारे पतसंस्थेचे अध्यक्ष श्री गजानन नेहारे, प्रमुख अतिथी तिवसा पंचायत समितीचे गटशिक्षणाधिकारी डॉ.श्री नितीन उंडे, शिक्षक समितीचे जिल्हाध्यक्ष श्री अजयानंद पवार, शिक्षक बँकेच्या संचालिका सौ.सरिता काठोळे होते. यावेळी डॉ.श्री नितीन उंडे यांचे हस्ते राष्ट्रसंत कॉलनी तर्फे शाल श्रीफळ मानपत्र देवून सपत्नीक व परिवारासमवेत त्यांचा येथोचित सन्मान व सत्कार करण्यात आला. तसेच श्री संतोष साव व संगिता साव यांचे तर्फे शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देवून व सरीता काठोळे तर्फे सुद्धा त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी त्यांची कन्या कु.तेजल मुलगा प्रथमेश त्यांच्या अर्धांगिनी सौ.अर्चना काकडे यांनी भावना प्रधान मनोगत व्यक्त केले. तसेच सौ.स्वाती बोकाडे, सौ.मालती कांडलकर,सौ.सारिका ठाकुर, सौ.शारदा शेकार सौ.सुनीता जिकाटे, सौ.तारा भाकरे ,सर्वश्री सुनील आमले, विजय उमप, सुनील निंघोट, विजय भाकरे, सचीन इंगोले, यांनी आपल्या मनोगतातून त्यांच्या कार्याचा गौरव केला. श्री सुनील आमले व कन्हैया या पिता पुत्राचा वाढदिवस सुद्धा यावेळी साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाचे सुरेख सुत्र संचालन श्री चंद्रकांत शेकार, प्रास्ताविक श्री प्रकाश कांडलकर, तर आभार श्री सुरेश ठाकुर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी शिक्षक समितीचे तिवसा तालुका अध्यक्ष श्री सुनील बोकाडे यांचेसह श्री सुभाष जिकाटे ,श्री किशोर गंधे ,श्री मुनेश्वर उमप, मनोज निंघोट, स्वप्नील राऊत यांचे सह सर्व राष्ट्रसंत कॉलनीवासी यांचे सहकार्य लाभले.

# मासोद झेडपी शाळेतील शिक्षक निलंबित

## मुख्याध्यापकासह ग्रामसेवकाला 'शो-कॉज' : सरप्राइज व्हिजिटदरम्यान सीईओंची कारवाई : गैरहजर असल्याचा ठपका

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

सीईओंच्या सरप्राईज व्हिजिटदरम्यान गैरहजर आढळलेल्या एका शिक्षकाला निलंबित करण्यात आले असून मुख्याध्यापक व ग्रामसेवकाला 'शो-कॉज' देण्यात आली.


अमरावती पंचायत समिती अंतर्गत येणाऱ्या मासोद येथील शाळेत कार्यरत असलेले एक शिक्षक सतत गैरहजर राहणे, शाळेत हजर राहून दैनदिन शैक्षणिक कार्य जबाबदारीनुसार पार न पाडणे अशा प्रकारचे गैरवर्तन करीत असल्याची तक्रार या गावातील काही पालकांनी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीयांच्याकडे केली होती. या तक्रारीची दखल घेत सीईओ संजीता महापात्र यांनी १४ ऑक्टोबर रोजी मासोद येथे आकस्मित भेट दिली. या भेटीदरम्यान त्यांनी शाळेत विद्यार्थी व शिक्षकांसोबत संवाद साधला. यादरम्यान त्यांना एक शिक्षक शाळेत गैरहजर असल्याचे दिसून आले. त्यामुळे या शिक्षकांवर निलंबन कारवाई केली, तर शाळेत मुख्याध्यापक व ग्रामपंचायतीमध्ये ग्रामविकास अधिकारी हे हजर नसल्याचे त्यांना 'शो-कॉज' बजाविली आहे. दरम्यान, मुख्याध्यापक हे शैक्षणिक कामानिमित्त अमरावती येथे असल्याची बाब बुधवारी सीईओंसमोर झालेल्या सुनावणीत निष्पन्न झाली, तर ग्रामविकास अधिकारी यांची सुनावणी सायंकाळी ५ वाजता ठेवण्यात आल्याची माहिती सीईओंनी दिली. सीईओंच्या या कारवाईमुळे तालुक्यात चांगलीच खळबळ उडाली आहे.

# ४० ॲप्सच्या सक्तीने त्रस्त शिक्षक 'एकत्रित डिजिटल व्यवस्था'ची गरज तीव्र

## प्राथमिक शिक्षक संघटना यांची शालेय शिक्षणमंत्री यांच्याकडे मागणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

राज्यातील शिक्षक संध्या सुमारे ४० विविध शासकीय ॲप्स वापरत आहेत. दररोज शिक्षकांना विविध ऑनलाईन ॲप्स, लिंक, अहवाल, प्रशिक्षण आणि सर्वेक्षण यांमध्ये व्यस्त राहावे लागत आहे.हे सर्व ऑप एकत्रित करून शिक्षक मैत्रिणपूर्ण डीजिटल प्रणाली निर्माण करावी अशी मागणी प्राथमिक शिक्षक संघटना यांनी शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे व शालेय शिक्षण विभागाचे अधिकारी यांच्याकडे केली आहे.संध्दा ४०ऑप शिक्षक वापरत आहे.त्यामुळे स्वतःचे मोबाईल हँग होत आहे. त्यामध्ये खालील प्रमुख ॲप्स आहेत सरल (SARAL), शालार्थ (Shalarth), यू-डायस प्लस (UDISE+), मध्यान्ह भोजन (Mid-Day Meal App), प्रेरणा (Prerna App), प्रेरणा डीबीटी (Prerna DBT), महाडीबीटी (MahaDBT), दीक्षा (DIKSHA), रीड अलाँग (Read Along), निपुण प्लस (Nipun Plus), शारदा (Sharada), उल्लास (ULLAS), समर्थ पोर्टल (Samarth Portal), iGOT कर्मयोगी (iGOT Karmayogi), निपुण टीचर ॲप (Nipun Teacher -pp), हरितिमा (Haritima), ईको क्लब (Eco Club), एम-आधार (mAadhaar), उमंग (UMANG), पी.एफ.एम.एस. (PFMS), महा स्कूल (Maha School), प्रश्नास्त (PRASHAST), स्वच्छ



सर्वेक्षण ग्रामीण (Swachh Survekshan Grameen), स्विफ्ट चॅट (Swift Chat), खान अॅकॅडमी (Khan Academy), गूगल मिट (Google Meet), झूम (Zoom), एन.आय.एल.पी. (NILP), एन.बी.एम.सी. (NBMC), ई-कवच (E-Kavach), एफ.एस.एस.ए.आय. (FSSAI), जी.पी.एस. (SGP), फिट इंडिया (Fit India), ज्ञान समीक्षा (Gyan Samiksha), प्रेरणा अहवाल पोर्टल, आणि परख (Parakh Portal) इत्यादी.या सर्व ॲप्सवर शिक्षकांकडून दररोज हजेरी, विद्यार्थ्यांचे अहवाल, सर्वेक्षण,प्रशिक्षण, आणि विविध शासकीय माहिती अनिवार्यपणे भरावी लागते. तसेच विविध व्हॉट्सॲप गटांवरून २४ तास आदेश व लिंक येतात. परिणामी शिक्षकांचा अध्यापनासाठीचा वेळ अत्यल्प उरतो. ही परिस्थिती भारतीय संविधानातील कलम २१-(शिक्षणाचा अधिकार तसेच राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या उद्देशांशी विसंगत आहे. शिक्षकांचे मूळ कार्य म्हणजे अध्यापन परंतु तांत्रिक आणि प्रशासकीय कामांमुळे हे कार्य प्रभावित होत आहे.

**मागण्या**

सर्व ॲप्स एकत्र करून एक एकत्रित Unified Education App तयार करावा विनंती. ऑनलाईन अहवालांची संख्या मर्यादित ठेवावी.शाळांमध्ये डिजिटल डेटा एंट्री सहाय्यक पद निर्माण करावी. इंटरनेट नसताना माहिती सेव्ह करून नंतर अपलोड करता येईल अशी ऑफलाईन सुविधा द्यावी. व्हॉट्सॲप व सोशल मीडियावरून आदेश देणे थांबिण्यात यावी शिक्षकांच्या अध्यापन वेळेचे संरक्षण करणारी डिजिटल कार्य धोरण शासनाने निश्चित करावी.केंद्र शाळा आणि प्रत्येक माध्यमिक शाळेवर ऑनलाईन कामा करीता संगणक प्रणाली उपलब्ध करावी तसेच या करीता कंत्राटी संगणक ऑपरेटरची नेमणूक करावी अश्या मागणीचे निवेदन सादर करण्यात आले आहे.

# लक्ष्मीच्या मूर्तींना विदर्भासह परराज्यात मागणी

## अमरावती शहरात दरवर्षी तयार करतात ७० हजारांवर मूर्ती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

रेखीव चेहरा, आकर्षक कलाकुसर आणि उत्तम रंगसंगतीमुळे शहरात निर्मित श्री लक्ष्मींच्या मूर्तींना लक्ष्मीपूजनाला पूजा करण्यासाठी विदर्भासह परराज्यातही मोठ्या प्रमाणात मागणी आहे. नवरात्रोत्सव आटोपला की, लक्ष्मीच्या मूर्तींची सजावट सुरू होते. माती व काही प्रमाणात पीओपीपासून निर्मित या मूर्तींवर अंतिम हात फिरवला जातो. लक्ष्मीचा हसरा चेहरा व बैठकीतील मूर्ती मोठ्या प्रमाणात तयार केली जाते कारण तिलाच सर्वाधिक मागणी असते, असे मूर्तीकार प्रमोद जावरे यांनी सांगितले.



शहरात लक्ष्मीच्या सुबक मूर्ती ५०० रु.पासून ते ३ हजार रुपयांपर्यंत उपलब्ध आहेत. या मूर्तींना साडी, चोळी घातली जाते. तसेच नाकात नथ, गळ्यात कृत्रिम हार, डोक्यावर ओढणी, कृत्रिम खडे, मोत्यांनी सजावट केली जाते. घरात पुजेसाठी अर्धा ते दीड फुटापर्यंत मूर्ती नागरिक खरेदी करतात. अनेकजण त्यांच्या आर्थिक क्षमतेनुसार मूर्तीची खरेदी करीत असतात. अगदी सुबकपणे तयार केलेली मूर्ती सर्वांच्या पसंतीस उतरते. एक मूर्ती सजवण्यासाठी किमान चार ते पाच तास लागतात. या देखण्या मूर्तींना जबलपूर, इंदूर, नागपूर, चंद्रपूर, धुळे, पुणे येथे मोठ्या प्रमाणात मागणी आहे. अमरावतीकर पुण्यात मोठ्या प्रमाणात स्थायिक झाल्यामुळे जर दिवाळीत त्यांना गृहनगरात येणे शक्य नसेल तर ते पुण्यातील घरीच लक्ष्मीच्या मूर्तीची पूजा करतात. त्यामुळे दरवर्षी अमरावतीतून मूर्ती मागवली जाते. तिला व्यवस्थित पॅक करून पार्सल केले जाते. पुण्यासह नागपुरातही अमरावतीत तयार झालेल्या अनेक मूर्ती दरवर्षी विक्रीसाठी मागवल्या जातात.

अमरावती हे विदर्भातील कलेचे माहेरघर असून, येथे तीन कुंभारवाडे आहेत. येथे दरवर्षी श्री गणेश तसेच नवरात्रोत्सवात दुर्गा देवी, महाकाली, शारदा देवीच्या मूर्ती घडवल्या जातात. त्याचप्रमाणे दिवाळीतही लक्ष्मी देवीच्या मूर्ती तयार केल्या जातात.

मूतीच्या चेहऱ्याची रंगरंगोटी हीच महत्त्वाची बाब असते. डोळे, नाक, ओठ जर सुबक असेल तर मूर्ती देखणी दिसते. चेहरा हसरा दिसावा यासाठी कलावंतांद्वारे विशेष परिश्रम घेतले जातात. यात अनुभवी असलेल्या पुरुष, महिला कलावंतांकडे चेहरा रंगवण्याचे काम असते. त्याचप्रमाणे मूर्तीची सजावट करण्यासाठीही विशेष कलावंत लागतात. या सर्वांच्या परिश्रमातून लक्ष्मी देवीची उत्तम मूर्ती घडते, असे मूर्तीकारांनी सांगितले. अमरावतीत दरवर्षी ६० ते ७० हजार लक्ष्मीच्या मूर्ती तयार केल्या जातात. सर्वाधिक मागणी ही हसरा चेहरा व कृत्रिम दागिणे, साडी, चोळीने सजलेल्या मूर्तीला असते. यासाठी भाविक ३ ते ४ हजार रुपये देण्यास तयार असतात. अनेकजण वर्षभर या मूर्तीची पूजा करतात. विशेषत: प्रतिष्ठानांमध्ये अशा मूर्ती लक्ष्मी पूजनाला पूजेसह नियमित पूजेसाठी खरेदी केल्या जातात, अशी माहितीही मूर्तीकार प्रमोद जावरे यांनी दिली.

# अमरावती पोलीस आयुक्तालयाचा उपक्रम २६ लाखांचा मुद्येमाल परत; १७१ हरवलेले मोबाईल तक्रारदारांच्या हाती!

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

सायबर गुन्हेगारीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर अमरावती शहर पोलीस आयुक्तालयाने गहाळ व चोरीस गेलेल्या मोबाईल हँडसेटचा शोध घेऊन मूळ तक्रारदारांना ते परत देण्याचा स्तुत्य उपक्रम हाती घेतला आहे. दिनांक १६ ऑक्टोबर २०२५ रोजी पोलीस आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात झालेल्या मिसींग मोबाईल वाटप कार्यक्रमात एकूण १७१ मोबाईल तक्रारदारांना परत करण्यात आले.




या मोबाईल्सची एकूण अंदाजित किंमत २६ लाख ३० हजार रुपये इतकी असून, यामध्ये सायबर पोलीस स्टेशनमार्फत तांत्रिक पद्धतीने शोधलेले १०५ मोबाईल्स (किंमत: १५.७५ लाख रुपये) समाविष्ट आहेत. याशिवाय, CEIR पोर्टलच्या माध्यमातून शोध घेऊन आणखी ५२ मोबाईल्स (किंमत: ८.४५ लाख रुपये) परत करण्यात आले. बडनेरा पोलीस स्टेशनमार्फत १४ मोबाईल्स (किंमत: २.१० लाख रुपये) तक्रारदारांना देण्यात आले आहेत.पोलीस आयुक्तालयाने नागरिकांना आवाहन केले आहे की, सायबर फसवणूक, सोशल मीडिया अत्याचार, किंवा हरविलेल्या मोबाईलसंदर्भातील तक्रारीसाठी नागरिकांनी १९३० / १९४५ या सायबर हेल्पलाईन क्रमांकांवर संपर्क साधावा किंवा www.cybercrime.gov.in www.ceir.gov.in`m पोर्टल्सचा वापर करून आपली तक्रार तात्काळ नोंदवावी असे आवाहन पोलीस प्रशासनाकडून करण्यात आले.

# काँग्रेसच्या माजी शहराध्यक्षांसह अनेक पदाधिकारी भाजपात

**विदर्भ प्रजासत्ताक दि. १६ कराड**

काँग्रेसच्या माजी शहराध्यक्षासह कराड पालिकेचे माजी पदाधिकारी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांनी मुंबईत भाजपत जाहीर प्रवेश केल्याने काँग्रेससह शिवसेनेच्या दोन्ही गटांना मोठा धक्का बसला असून, भाजपचे जिल्हाध्यक्ष, आमदार डॉ. अतुल भोसले यांची ही मोठी खेळी यशस्वी झाली आहे. त्याचा फटका काँग्रेससह दोन्ही शिवसेनांना सुद्धा बसला आहे . या घडामोडींनी राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

मुंबईतील भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, आमदार डॉ. अतुल भोसले, भाजप प्रदेश सरचिटणीस, आमदार विक्रांत पाटील, प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर यांच्या उपस्थितीत मंगळवारी काँग्रेसचे माजी कराड शहराध्यक्ष, माजी नगरसेवक राजेंद्र माने, माजी नगरसेवक इंद्रजीत गुजर, पालिकेतील माजी विरोधी पक्षनेत्या स्मिता हुलवान, संजय कांबळे यांच्यासह कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. इंद्रजीत गुजर हे शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे तर, स्मिता हुलवान या शिवसेना शिंदे गटाच्या येथील सक्रिय कार्यकर्त्या होत्या.

# अमरावतीच्या हनुमान गढी येथे दीपावलीनिमित्त भव्य दीपोत्सव

## अयोध्येहून आलेल्या पवित्र ज्योतीतून प्रज्वलित होणार ७ फूट उंच अखंड दिवा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

दिपावलीच्या पावन पर्वानिमित्त अमरावती शहरात एक अनोखा आणि दिव्य उपक्रम राबविण्यात येत आहे. रविवार, दिनांक १९ ऑक्टोबर २०२५ रोजी छत्री तलाव रोडवरील हनुमान गढी येथे भव्य दीपोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे अयोध्येतील श्रीराम मंदिरातून खास आणलेली पवित्र दीपज्योत, जी येथे ७ फूट उंच अखंड दिव्यामध्ये प्रज्वलित करण्यात येणार आहे.

हा दीपोत्सव हनुमान चालिसा चॅरिटेबल ट्रस्ट, ४० फाउंडेशन, आणि महाराष्ट्रातील सर्वात उंच – १११ फूट – हनुमान रायाच्या मूर्तीच्या सान्निध्यात संपन्न होणार आहे. एकूण १५१ फूट उंचीच्या या धार्मिक स्थळावर हजारो दिव्यांनी प्रकाशमान वातावरण तयार होणार आहे.सायंकाळी ६ वाजता दीपज्योतीची आरती होईल, त्यानंतर ७.३० वाजता दीप महोत्सवाचा शुभारंभ होईल. रात्री ९ वाजता रंगीत आणि भव्य आतषबाजीने हा दीपोत्सव अधिक लक्षवेधी ठरणार आहे.अमरावती शहरातील नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, आपल्या कुटुंबाच्या सुख, शांती, आरोग्य आणि उज्वल भविष्यासाठी या अखंड दीपज्योतीत २ थेंब तेल टाकावे व एक दिवा प्रज्वलित करावा. प्रभु श्रीरामाच्या अयोध्येतील आगमनप्रसंगी झालेल्या दीपोत्सवाची आठवण करून देणारा हा सोहळा अंधारावर प्रकाशाचा विजय दर्शवणारा आहे.या उपक्रमामुळे धर्म, संस्कृती व सामाजिक ऐक्याचे दर्शन घडणार असून, अमरावतीतील नागरिकांसाठी हा दीपोत्सव एक विशेष आध्यात्मिक अनुभव ठरणार आहे, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला आहे.

# हलाल मुक्त दिवाळी साठी हिंदूंनी एकत्र यावे

## अमरावतीत जनजागृती आंदोलन



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

भारतात धर्मनिरपेक्षतेच्या मुखवटच्याआड इस्लामी 'हलाल प्रमाणिकरण' सक्तीने लादले जात असल्याचा आरोप करत हिंदु जनजागृती समितीने आज हलाल मुक्त दिवाळी या आंदोलनाचे आयोजन केले. हे शांततामय जनजागृती आंदोलन आज सायंकाळी ५ ते ६.३० या वेळेत राजकमल चौक, अमरावती येथे पार पडले.

या आंदोलनाचा उद्देश फक्त हलाल प्रमाणपत्राच्या सक्तीविरुद्ध आवाज उठवणे नव्हे, तर भारताची अर्थव्यवस्था धर्मनिरपेक्ष आणि स्वदेशी तत्वांवर आधारित रहावी, हा आग्रह देखील होता. आंदोलनात अनेक नागरिक, व्यापारी आणि संघटनांचे प्रतिनिधी सहभागी झाले होते.

हिंदु जनजागृती समितीने उपस्थित जनतेला आवाहन केले की, हलाल प्रमाणपत्राच्या माध्यमातून एकतर्फी आर्थिक व्यवस्थेची मक्तेदारी होऊ शकते. त्यामुळे सर्व धर्मांना समान न्याय मिळावा, हीच खरी धर्मनिरपेक्षता आहे. दिवाळी ही स्वदेशी आणि सनातन मूल्यांची ओळख असावी, यासाठी 'हलाल मुक्त दिवाळी' हे पाऊल गरजेचे आहे.कार्यक्रमाच्या शेवटी आयोजकांनी उपस्थित नागरिकांना हलाल मुक्त भारत घडवण्यासाठी पुढे येण्याचे आणि अधिकाधिक लोकांपर्यंत हे जागृतीचे आंदोलन पोहोचवण्याचे आवाहन केले.

# अमरावतीत पाणीपुरवठा संकट? ठेकेदारांचे १८ कोटी थकित

## महाराष्ट्र जीवन प्राधिकरण कार्यालयावर ठिय्या आंदोलन उद्यापासून जिल्हाभर पाणीपुरवठा बंद होण्याचा इशारा!



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अमरावती**

अमरावतीतील महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (चगझ) कार्यालयात आज संतप्त कंत्राटदार आणि पाणीपुरवठा करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी जोरदार ठिय्या आंदोलन छेडले. गेल्या सालभरापासून थकलेल्या तब्बल १८ कोटी रुपयांच्या देयकांमुळे कंत्राटदार आणि त्यांच्यावर अवलंबून असलेले मजूर आक्रमक झाले आहेत.

आंदोलनादरम्यान, शेकडो कंत्राटदार आणि कर्मचारी कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयातच घुसले आणि जोरदार घोषणाबाजी केली. संतप्त आंदोलकांनी उद्यापासून संपूर्ण अमरावती जिल्हा व शहराचा पाणीपुरवठा बंद करण्याचा इशारा दिला आहे.कंत्राटदारांच्या म्हणण्यानुसार, वर्षभर थकित असलेल्या देयकांमुळे मजुरांना वेतन देता न आल्याने त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. शासनाकडून सातत्याने आश्वासने मिळत असूनही प्रत्यक्षात निधी मिळत नसल्याने परिस्थिती हाताबाहेर जात आहे.या आंदोलनामुळे जिल्ह्यातील पाणीपुरवठ्याची गंभीर समस्या उद्भवू शकते. प्रशासनाने तातडीने लक्ष घालून थकित देयके अदा करावीत, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे. अन्यथा पाणीपुरवठा ठप्प करण्याचा निर्णय अटळ असल्याचा पुनरुच्चार करण्यात आला.

# ई-केवायसीमुळे लाडक्या बहिणींसमोर अडचणींचा डोंगरवारंवार एरर, ओटीपीही येईना : इंटरनेटची समस्या

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१६अचलपूर**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत प्रत्येक लाभार्थी महिलेला ई-केवायसी करणे बंधनकारक करण्यात आले आहे. ई-केवायसीसाठी लाडक्या बहिणींसमोर अडचणी निर्माण झाल्या आहेत. संकेतस्थळावर वारंवार एरर येत असून, ओटीपी येत नसल्याने लाडक्या बहिणींच्या अडचणीत वाढ झाली आहे.

ई-केवायसीच्या माध्यमातून पात्र लाभार्थी महिलांची राज्य सरकारने पडताळणी सुरू केली आहे. यासाठी राज्यभरातील लाखो महिलांनी लाडकी बहीण योजनेसाठी नोंदणी केली. आता केवायसीसाठी दोन महिन्यांची मुदत शासनाने दिली आहे. यात ई-केवायसी करण्याची प्रत्येक स्तर सविस्तरपणे सांगितला जात आहे. मात्र, संकेतस्थळ सुरळीत चालत नसल्याच्या अनेक तक्रारी वाढल्या आहेत. ई-केवायसीच्या संकेतस्थळावर क्लिक




केल्यावर त्याला सुरू व्हायला खूप विलंब लागतो. कसेतरी सुरू झाले तर साईडवरून ओटीपी पाठविला असता मोबाइलवर ओटीपी येत नाही. त्यामुळे अनेक महिला तासनतास आपल्याजवळ मोबाइल घेऊन ओटीपीची वाट बघत बसतात. त्यामुळे लाडक्या बहिणींची गैरसोय होत मोबाइलवर ओटीपी आला तर तो आहे. अनावधानाने लाभार्थी बहिणीच्या ओटीपी टाकायचा कुठे? हा प्रश्न निर्माण झाला आहे. ओटीपी टाकण्यासाठी संकेतस्थळावर बॉक्स उपलब्ध नाही. यामुळे लाडक्या बहिणींना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत आहे.

### मुदतवाढ देण्याची मागणी

महिलांना ई-केवायसी प्रक्रिया करण्यास विलंब लागत आहे. ई-केवायसी प्रक्रिया करताना ओटीपी येत नसल्याच्या तक्रारीही मोठ्या प्रमाणात समोर येत असून, या समस्या सोडवून ही प्रक्रिया सुलभ करावी आणि ई-केवायसीची तारीख वाढवावी, अशी मागणी लाडक्या बहिणींकडून केली जात आहे.

# ऐन दिवाळीच्या सणालाच रेशन दुकानातून गहू गायब

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.१५खल्लार**

खल्लार सर्वात मोठा सण दिवाळी सोहावर आला आहे. दिवाळी हा शब्द उच्चारला, तरी आपल्या अंगात उत्साह संचारतो, मन आनंदी होते. नवी खरेदी, फराळाचे नठीन पदार्थ, रांगोळी, रोषणाई, भेटवस्तू आणि आनंदी आनंद अशा बाताबरणाची आस आपल्याला लागते.

अशातच यदा एकीकडे दिवाळीसाठी राज्य सरकारकडून आनंदाचा शिधा रेशनकार्ड धारकांनादिला जाणार नाही, तर दुसरीकडे ग्रामीण भागातील रेशन दुकानावर गहू ऐवजी ज्वारी दिली जात आहे. शिवाय तांडूकदेखील निकृष्ट दर्जाचा असल्यामुळे दिवाळी साजरी करायची कशी, असा प्रश्न सर्वसामान्य नागरिकासह गोरगरिक्षांना पडला असून दिवाळीला गोडधोड केले जाते. त्यासाठी गहू आणि चांगला तांदूळ लागतो. मात्र रेशरावर राशन दुकानात एक किलो उधारी आणि चार किलो तांदूळ दिले जात आहे. मात्र ज्वारीचे वाटप करण्यात येत असल्यामुळे पुरणाच्या पोळीऐवजी ज्वारीच्या भाकरीवर यंदा दिवाळी साजरी करण्याची वेळ सर्वसामान्य नागरिकांवर आली असल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली आहे.


आता आपल्या मोबाईल वरच वाचा
राज्यासह जिल्ह्यातील महत्वाच्या घडामोडी
प्रिंट
पिडीएफ
ई- पेपर
वेबपोर्टल
Q R कोड स्कॅन करा व आमच्या ग्रुप ला जॉईन व्हा!
दररोज रात्री 8 वाजता वाचा
निवांत!!
सांध्य दैनिक
विदर्भ प्रजासत्ताक
https://epaper.vidarbhaprajasattak.com, follow us on
राजकीय,सामाजिक,कृषी,शैक्षणिक,क्रीडा,क्राईम
विश्वातील सर्व घडामोडी वाचा आता आमच्या सोबत